# राजमाता जिजाई

अशोक बेंडखळे



## आभार

# राजमाता जिजाई

या पुस्तकाचे सर्व हक्क लेखक श्री. अशोक बेंडखळे यांचेकडे आहेत.

"राजमाता जिजाई" या चरित्राची ही ई आवृत्ती आहे. ई साहित्यावर विनामूल्य करण्यात आली आहे. याची छापिल प्रत विकत मिळू शकेल.

हे पुस्तक ई साहित्यवर विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही श्री. अशोक बेंडखळे यांचे मन:पुर्वक आभार मानतो. या पुस्तकाच्या विनामूल्य ई वितरणाची परवानगी दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान- ग्रंथाली, मुंबई यांचे मन:पूर्वक आभार मानते.

वाचकांनी वाचून झाल्यावर हे पुस्तक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचवावे (Forward and viral) अशी विनंती आम्ही सर्व वाचकांना करतो.

पुस्तकावरील आपले अभिप्राय

**श्री. अशोक बेंडखळे** यांना **9869258585**

या क्रमांकावर कळवावे.


ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी नाव आणि गाव Whatsapp करा

User2:\E:\Aniruddha\2022 Books\Ashok Bendakhale\Rajmata Jijai\First Pages.pmd

# राजमाता जिजाई

अशोक बेंडखळे

ग्रंथाली

ग्रंथाली प्रकाशन क्रमांक ११८१

ISBN No. 978-93-5795-00 ????

**राजमाता जिजाई**
अशोक बेंडखळे

पहिली आवृत्ती : २५ नोव्हेंबर २०२२

© अशोक बेंडखळे
२/३०९ 'डी', विमान दर्शन, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९.
भ्रमणध्वनी : ९८६९२५८५८५
ashok.bendkhale@gmail.com

प्रकाशन
ग्रंथाली
१०१, १/बी विंग 'द नेस्ट',
पिंपळेश्वर को-ऑप. सोसायटी,
टायकलवाडी, स्टार सिटीसमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : (०२२) २४२१६०५०
granthalibooks@gmail.com

मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे : प्रमोद जोशी

अक्षरजुळणी : ग्रंथाली संगणक विभाग

मुद्रण
इंडिया प्रिंटिंग वर्क्स,
इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाळा, मुंबई ४०० ०३१

**मूल्य १०० रुपये**

*छोटा नातू अर्जुन यास–*

*दुबईत राहून मराठी शिकण्याची तुझी धडपड कौतुकास्पद*

# मनोगत

छोट्या मुलांसाठी इतिहासातील पराक्रमी स्त्रियांची चरित्रे लिहायची हे माझ्या मनात खूप वर्षांपासून होते. सहा वर्षांपूर्वी राजा प्रकाशनाचे मुळे यांनी सुचवल्याप्रमाणे आधुनिक काळातील पाच स्त्रियांची चरित्रे लिहिली आणि 'महाराष्ट्राच्या पंचकन्या' या मालिकेअंतर्गत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे आणि आनंदीबाई कर्वे या छोटेखानी पुस्तकांची निर्मिती झाली. डोक्यातला मूळ विचार गेला नव्हता. त्यातून राणी लक्ष्मीबाईंचे छोटे चरित्र लिहिले आणि 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांना भेटलो. ते तात्काळ म्हणाले, ''एक पुस्तक का? पाच पुस्तके करूया.'' अशाप्रकारे 'ऐतिहासिक पंचकन्या' अंतर्गत राजमाता जिजाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, अहिल्याबाई होळकर आणि राणी लक्ष्मीबाई अशी पाच पुस्तके तयार झाली.

राजमाता जिजाई या शिवाजी राजांच्या माता, त्यांच्या मनात स्वराज्याचा अंकुर रूजवणाऱ्या आणि त्यांना हिंदवी राज्याची प्रेरणा देणाऱ्या. जिजाईंना बालपणी मराठी सरदार परकीयांची वेठबिगारी करतायेत हे आपल्या बंधुंकडून कळले आणि त्यांच्या मनात स्वराज्याचा विचार पक्का झाला. त्यांनी राजांवर उत्तम संस्कार केले. मर्दानी कलांमध्ये पारंगत केले. पुण्याचा कारभार पाहताना शिवबांना कारभाराची तंत्र-मंत्र शिकवली. शिवाजी राजे मोहिमांवर जात तेव्हा जिजामाता कारभाराकडे लक्ष देत. राजांचा राज्याभिषेक झाला आणि आपला पराक्रमी पुत्र लोकांचा राजा झाला हे पाहून त्या कृतार्थ झाल्या. एक माता मनात आणले तर काय करू शकते त्याचे जिजामाता हे ज्वलंत उदाहरण आहे.

जिजाईंचे हे छोटे चरित्र प्रसिद्ध होताना खूप आनंद होतो आहे. चित्रकार प्रमोद जोशी यांनी प्रसंगानुसार सुंदर रेखाचित्रे काढली आहेत, मुखपृष्ठही मोहक रेखाटले आहे. त्यांचे तसेच पुस्तक देखण्या रूपात प्रसिद्ध केल्याबद्दल 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांचे मनःपूर्वक आभार!

**■ अशोक बेंडखळे**

# अनुक्रम


१. जिजाईचं बालपण व लग्न / १

२. शहाजी राजांचा पराक्रम / ८

३. शिवजन्म आणि बालपण / १२

४. शिवबांचा पराक्रम प्रारंभ / २०

५. जिजाईचा कारभार / २५

६. जिजामातेची चिंता / ३३

७. पन्हाळ्याचा वेढा / ३८

८. शहाजी राजांचे निधन / ४२

९. जिजामातेची तुला / ४६

१०. राजांची आग्रा भेट / ४९

११. राजांचा राज्याभिषेक / ५४

# १. जिजाईचं बालपण व लग्न

शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाई. त्यांच्यावडिलांचे नाव लखूजी जाधव आणि आईचे नाव गिरजाबाई उर्फ म्हाळसाबाई. जिजाईचे वडील लखूजी हे कुलाभिमानी, महत्वाकांक्षी निडर आणि पराक्रमी होते. ते मूळचे सिंदखेडचे देशमुख. पराक्रम करावा या इच्छेखातर फौजबंद झाले. त्यावेळी फौजबंद पराक्रमी पुरुषांना चाकरीची चिंता नसे. लखूजीचे धैर्य आणि तडफ निजामशहाने बरोबर हेरली होती. त्यांना त्याला आपल्या पदरी ठेवून घेतले. लखूजींचा एकूण पराक्रम पाहून निजामशहाने सिंदखेड, पडतूर, खेरडे वगैरे प्रांत त्यांना खाजगी खर्चास दिले आणि पंचहजारी सरदारकी बहाल केली. महाल खर्चासाठी वैजापूर, गांडापूर, फुलंवर, पैठण वगैरे गावे लावून दिली. निजामशाहीचे एक मातब्बर सरदार म्हणून ते निजामाचे विश्वासू आधारस्तंभ बनले. सिंदखेडला लखूजींचा मोठा थोरला राजमहालला लाजवील असा राजवाडा होता आणि तो असंख्य सुशोभित दालनांनी गजबजलेला होता. वाड्यात दिवसभर हजारो माणसांचा राबता असे आणि दासदासींची सततची धावपळ त्यात चैतन्य आणी.

लखूजींना एक धाकटा भाऊ होता त्याचे नाव होते जगदेवराव.



दोघा भावांचे एकमेकांवर खूप प्रेम होते. लखूजी जाधवरावांना दत्ताजी, अचलोजी, रघूजी व बहादूरजी असे चार मुलगे आणि जिजाई ही एक मुलगी अशी पाच अपत्ये होती. जिजाईचा जन्म सिंदखेड इथे १५९७च्या सुमारास झाला होता. जगदेवरावाला मूलबाळ नसल्यामुळे आपल्या भावाच्या मुलांवर त्याची खूप माया होती. जिजाईचा तर त्याला अतिशय लळा होता.

एकदा जिजाई आपला मोठा भाऊ दत्ताजीबरोबर पहाटेस घोडीवरून रपेटीस गेली होती. त्यावेळचा हा प्रसंग आहे. एका आनंदाच्या क्षणी जिजाईने आपल्या दादाकडे पाहिलं, तर त्याच्या डोळ्यात अश्रू होते. यावर तिनं विचारलं, 'काय झालं दादा सांगशील का मला?'

दादा म्हणाला, 'कोणे एकेकाळी अनेक पराक्रमी, शक्तिशाली राजे इथं राज्य करीत होते. पण आमच्या अंतर्गत दुश्मनीनं घात केला, आमचे राजे पराभूत झाले. आता फक्त आम्ही नावाचे राजे राहिलो.'

'आपला मुलुख परत नाही का मिळवता येणार दादा?, जिजाईनं उत्सुकतेनं विचारलं.

'जिजू अगं आमचा पराक्रम परकीयांची वेठबिगारी करतोय. बाहेरच्या माणसांनी इथल्या आया बहिणींना पळवावं आणि आम्ही षंढासारखे बघतो. कारण एकमेकांमधील हेव्यादाव्यापायी आम्ही हतबल झालोय.' दादा अगतिकर्तनं उत्तरला.

जिजाई आपल्या दादाला एवढा हतबल झालेला प्रथमच पाहत होती. तिचे मनसुद्धा विचारात बुडून गेले.

उन्हं डोईवर आली तशी दोघांनी आपली घोडी वळवली आणि घराकडे निघाले.

जिजाई दत्ताजी दादाबरोबर वाड्यात पोचली तेव्हा साऱ्या वाड्यात धावपळ सुरू झाली होती. आऊसाहेब म्हाळसाबाई जिजाईला म्हणाल्या, 'अगं, तू दांडपत्ता खेळतीयस् तलवार चालवतीयस, घोडदौड करतीयस. पोरींचे खेळ नव्हंत ते. कधी समजणार तुला?'

'आऊसाहेब आता पोरीनीच स्वतःचं रक्षण करायला हवं. दादासाहेब शिकवतात मला. त्या शिवा तांबटाच्या पोरीला पळवलंय बघा खोजाखानानं.'

'खरंय तुमचं म्हणणं. यवन भारी माजलेत. आता बायकानीच हाती शस्त्र धरायला हवं' आऊसाहेब तिच्या मताशी संमत होत म्हणाल्या.

वाड्यात गडबड चालू होती ती फलटूनहून सरदार कृष्णजीत आले होते म्हणून. लखूजी जाधवरांवांचे भाचे वनगोजी निंबाळकर यांनी खास कामासाठी त्यांना धाडले होते. भोजनोत्तर सरदार कृष्णजीतांनी एक प्रस्ताव मांडला. 'ते म्हणाले.' निंबाळकरांची बहीण दिवाबाईसाहेब आणि त्यांचे पतिदेव मालोजीराव भोसले ह्यांचे ज्येष्ठ चिरंजीव शहाजीराजे हे जिजाबाईंना वर म्हणून योग्य आहेत. तर त्याचा

विचार व्हावा...'

राजे वनगोजी निंबाळकर आणि मालोजी भोसले यांनी एकत्रित आदिलशाही फौजांचा पराभव केला होता. त्याची बक्षिसी म्हणून निजामानं पंचहजारी मनसुब, पुणे, सुपे चाकण आणि इंदापूर ह्या गावची देशमुखी आणि शिवनेरी किल्ला मालोजीरावांना बहाल केला होता.

'त्याच्यांकडे बक्कळ पैसा हाय, जिजू ऐषोआरामात राहील' अशी खात्री कृष्णजीतांनी दिली यावर लखूजी जाधव म्हणाले, 'तुम्हास पसंत असेल तर आमचं बी हा समजा. तुमच्या शब्दाबाहेर नाहीत आम्ही.'

सरदार कृष्णजीत पुढे म्हणाले, 'राजे निजामासीसुद्धा हा रिस्ता मंजूर हाय बघा. तुम्ही दोघं सरदार निजामशाहीचे आधार तेवा दोघ बंधनात अडकला तर त्याला बी बरं आहे की.'

एवढ्या बोलण्यानंतर जिजाई आणि शहाजीराजे यांचं लग्न पक्क झालं.

लग्न तर नक्की झालं पण एक विघ्न आड आलं. अकस्मात इंदापूरच्या लढाईत शहाजीचे वडील मालोजी राजे कामी आले. मात्र मराठी सरदार शब्दाचा पक्का असतो. जिजाईचे वडील लखूजी राजेनी आपला शब्द पाळला. निजामच्या उपस्थितीत अहमदनगरला जिजाई आणि शहाजी यांचा थाटात लग्न सोहळा झाला. सिंदखेडच्या मातीत जन्मलेल्या लक्ष्मीरुपी जिजाईने भोसल्याचं भाग्य उजळायला नव्या घरात पाऊल टाकले. जिजाईचं मन स्थिर होतं. मजबूत विशाल खांद्याच्या शहाजींना पाहून ती मनोमन हरखून गेली होती.

जिजाई सासरला आली. तिचं सासर मोठं होतं. सासूबाई उमाबाईंनी तिची सर्वांशी ओळख करून दिली. दीर शरीफजी, चुलत सासरे विठोजी, चुलत दीर संभाजी, खेळोजी मल्लाजी, मम्बाजी,

नागोजी परसोजी, त्र्यंबकजी मक्काजी अशी सारी कुटुंब मंडळी एकत्र नांदताना पाहून जिजाई खूष झाली. निंबाळकर मंडळी फलटणला गेली आणि शहाजी, शरीफजी व सासुबाईंसोबत जिजाई घृणेश्वरी आली. तो परिसर अतिशय सुंदर होता. डोंगरकपारीत घृणेश्वराचं मंदिर होतं आणि समोर मोठा तलाव होता मालोजीराव घृणेश्वराचे भक्त होते आणि त्यांची त्यावर अतोनात श्रद्धा होती.

उमाबाईंना आपली नवी सून जिजाई खूप आवडली होती. तिचा गोरा वर्ण, देखणा चेहरा यामुळे सुनेला कुठे ठेवू असे तिला झाले होते.

सासरचे नवमीचे दिवस सरले आणि समज येईपर्यंत जिजाई माहेरी आली. जिजाईची वयाबरोबर समज वाढत होती. आता ती आजूबाजूची परिस्थिती नव्या दृष्टीने पाहत होती, अवलोकन करीत होती यवनांचा अत्याचार, मराठ्यांची लाचारी, शौर्य तिला कळू लागले.

'आमचा पराक्रम परकीयांची वेठबिगारी करतोय, हे आपले बंधू दत्ताजी साहेबांचे शब्द तिला परत परत आठवत होते. ही स्थिती बदलायला हवी हा विचार मनी पक्का झाला. ती सासरला परत आली ती मनात एक ध्येयनिष्ट विचार पक्का करून.

जिजाई माहेरी असताना दादोजी कोंडदेवांच्या मार्गदर्शनाखाली शहाजी आणि शरीफजी चांगले तयार झाले होते. शिवनेरीचे किल्लेदार विजयरावजींच्या भगिनी दुर्गाबाईंचा विवाह शरीफजींबरोबर झाला. आणि गोड लाघवी स्वभावाच्या दुर्गाबाईंसारखी चांगली मैत्रीण जिजाईंना मिळाली.

दरम्यान एक भयंकर प्रसंग घडला.

निजामानं बोलावलेल्या खास दरबार संपल्यावर प्रत्येकजण घरी परतू लागले होते इतक्यात चिथावून ठेवलेला हत्ती बिथरला व सैरावैरा धावू लागला. दत्ताजी राजे बेभान हत्तीवर धावून गेले आणि त्याने



हत्तीची सोंड तोडली. संभाजीने त्याला आडवले. आता जाधवांच्या तलवारी भोसल्यांच्या तलवारीला भिडल्या आणि काही ध्यानात येण्यापूर्वी संभाजीरावांच्या हातून दत्ताजीराजे मारले गेले. पुत्राच्या हत्तेने लखूजी राजांच्या डोळ्यात राग उसळला, समोर त्यांना शहाजीराजे दिसले. त्यांनी पुत्रप्रेमापायी जावई पाहिला नाही आणि त्यांच्यावर वार केले. त्यांना अडवण्यासाठी संभाजी राजे मध्ये आले आणि संभाजीराजे लखूजींच्या तलवारीला बळी पडले.

जिजाई झालेल्या प्रकाराने सुन्न झाली. एका बाजूला तिच्या दीराच्या समशेरीला तिचा सख्खा भाऊ बळी पडला होता तर दुसऱ्या बाजूला दीर संभाजी तिच्या वडिलांच्या तलवारीचा भक्ष्य झाला होता. आणि प्रत्यक्ष पतीला वडिलांच्या तलवारीचा वार बसला होता.

निजामशहाने हे प्रकरण जातीने मिटवले नसते तर आणखीही काही मुडदे पडले असते. लखूजी जाधव या प्रकरणानंतर निजामशहाला सोडून मोंगलाकडे गेले. भोसल्यांची बाजू शहाने घ्यावी या गोष्टीचा त्यांना राग आला होता. जाधव-भोसले यांच्यामध्ये प्रथम वितुष्ट

आले ते या प्रसंगाने. या सगळ्या प्रकाराने जिजाईला किती दुःख झाले असेल याची कल्पना करता येत नाही. परम दुःखाबरोबर माहेरला ती जवळजवळ मुकली.

■

# २. शहाजी राजांचा पराक्रम

शहाजी राजांचे वडील मालोजीरावांच्या आकस्मिक निधनानंतर शहाजींना निजामशहाकडून जहागिरी मिळाली होती. जिजाई तर पतीची सेवा करण्यात सदा तत्पर. त्यात आनंद मानणारी. मात्र राजांची स्वारी राजकारणात व लढायात दंग असे. आपल्या शूर व महत्वाकांक्षी पतीचा जिजाईला नेहमी अभिमान वाटत असे. पतीदेव मोहिमेवर गेले की ती चिंताग्रस्त होई आणि परत आले की तिला ती आनंदाची महापर्वणी वाटे, ती नटून थटून देवदर्शनाला जाई.

पती शहाजी राजे निजामशाहीचे जहागिरदार व फौजबंद सरदार होते. त्यांच्या कर्तबगारीला नुकतीच कुठे सुरुवात झाली होती. निजामशहाचा शूर व सूज्ञ वजीर मलिकंबर याचा शहाजी राजेंवर मोठा विश्वास होता. त्यांच्या पराक्रमी व शूरवृत्तीमुळे शहाजीराजे म्हणजे निजामशाहीचा आधार अशी सर्वांची समजूत झालेली होती. त्यामुळे दरबारात राजेंना मोठा मान होता. या निजामशाहीवर दिल्लीकर मोंगलांची नेहमी वक्रदृष्टी राहिलेली असे. त्यामुळे तिकडून कधी स्वारी होईल याचा नेम नसे. त्यात आणखी एक वाईट गोष्ट म्हणजे जिजाईचे वडील लखूजी राजे निजामशहावर रागावून मोगलाना मिळाले होते.

त्यामुळे एकीकडे पती तर दुसरीकडे वडील असा पेच जिजाईपुढे निर्माण झाला होता. अशा अशांत प्रसंगी जिजाईची घालमेल कल्पनेपलीकडची होती. या सुमारास तिला दिवस गेले होते आणि मुक्काम दौलताबादेस होता. मोगलस्वारीची चाहूल लागल्यामुळे शहाजीराजे अहमदनगरकडे गेले होते. इकडे जिजाई पूर्ण मास करून प्रसूत झाली. पुत्ररत्न झाले आणि त्याचे नाव संभाजी असे ठेवण्यात आले. पतीच्या विरह काळात जिजाईला एक विरंगुळा मिळाला होता. तिच्या अल्पसंतुष्ट मनाने त्यात आनंद मानला होता.

जिजाईच्या आयुष्याला स्वस्थता नव्हती. छोटा संभाजी जरा कुठे रांगतो न रांगतो तो युद्धाचे ढग जमा होऊ लागले. मोगलानी आणि विजापूरच्या आदिलशहाने हातमिळवणी करून निजामशाही संपविण्याचे ठरविले. उभयतांच्या फौजा अमहदनगरवर चालून आल्या. नगरपासून दहा मैलांवर भातवडी येथे युद्धास तोंड लागले (१६२४) मोगलाकडे जिजाईचे वडील जाधवराव तर निजामशाहीतर्फे मलिकंबराच्या नेतृत्वाखाली पती शहाजी राजे असा संग्राम सुरु झाला. युद्ध घनघोर झाले आणि शहाजीने मोठा पराक्रम करून विजय मिळवला. मोगल हरले, विजापुरचा सेनापती मुल्ला महमद मारला गेला. मलिकंबरने शहाजींची पाठ थोपटली. जाधवरावांवर तर पळून जाण्याचा प्रसंग ओढवला. मोगल बादशहा जहांगीर खजिल झाला आणि अदिलशहा अपयशाने खचून गेला. शहाजी राजांच्या पराक्रमाने सारेजण दिपून गेले. या विजयाला गालबोट लागले ते म्हणजे या युद्धात शहाजीराजांचा पाठचा भाऊ शरीफजी मारला गेला त्याचे.

भातवडीच्या युद्धानंतर निजामशाहीत शहाजीराजांचा दर्जा वरचा होणे अपेक्षित होते, पण झाले उलटे. मलिकंबराला शहाजी डोईजड होईल असे भय वाटले. त्याने त्यांच्या भावांना हाताशी धरून शहाजींची उपेक्षा आरभली. शहाजी राजेंना हे आवडले नाही. ते तडक आपल्या

जहागिरीकडे निघून गेले. आदिलशहाच्या कानावर ही बाब गेली. त्याने शहाजी राजांना बोलावून घेतले आणि त्यांना सरलष्कर हुद्दावर चढवले. राजांना ही नामी संधी मिळाली. त्यांनी पहिल्यांदा निजामशाहीमधील पुणे-पाटसकडील स्वतःच्या जहागिरीचा मुलूख अदिलशहाकडे घेतला मग मलिकंबरास एका लढाईत धूळ चारली. मुघोजी फलटणकरास वठणीवर आणले. या पराक्रमाने आदिलशहाची राजांवर मर्जी बसली. मात्र दुर्दैवाने १६२७ मध्ये आदिलशहा मरण पावला त्यापूर्वी मलिकंबरही पैगंबरवासी झाला होता (१६२६) या घटनांचा फायदा घेण्याच्या इराद्याने दिल्लीच्या शहाजहान बादशहाने निजामशाहीवर वक्रदृष्टी वळवली. शहाजीराजांना निजामशाहीबद्दल आपुलकी होती आणि आदिलशहाच्या पश्चात त्यांचा मान कुणी ठेवीना. अशा स्थितीत राजे १६२८च्या अखेर निजामशाहीत दाखल झाले. याच सुमारास राजांचे सासरे लखूजी जाधवराव मोगलाना सोडून दौलताबादेस आले. सासरे-जावयांची दिलजमाई होणार असे दिसत असतानाच एक दुर्दैवी घटना घडली.

निजामशहा संशयी बनला होता. सल्लागारांनी त्याचे कान जाधव-रावांविरुद्ध कलुषित केले. तो आपल्याला गोत्यात आणील सबब त्याचा निकाल लावावा असा सल्ला मिळताच एक भयंकर कारस्थान रचले गेले. किल्ले दौलताबादेस शाही दरबार भरला (२५ जुलै १६२९) जाधवराव मुजरे करण्यास निघाले, सोबत दोन पुत्र अचलोजी, रघूजी व नातू यशवंतराव यांना घेतले. मुजरे झाल्यावर शहा एकदम उठून गेला. प्रकार चमत्कारिक वाटून जाधवराव निघाले. पण ते चार पावले टाकतात तो त्यांच्यावर व तीन मुलांवर अचानक हल्ला झाला. त्यांच्या तलवारी हिसकावून घेण्यात आल्या. शूर मराठ्यांनी खंजीर काढले, झुंज दिली पण सामर्थ्य कमी पडून चौघा जाधवरावांची प्रेते पडली.

हा भीषण प्रकार कानावर येताच जाधव व भोसले कुटुंबात एकच हाहाकार उडाला म्हाळसाबाई व इतर बायका भीतीने सिंदखेडास गेल्या. जाधवरावांच्या सूना सती गेल्या. शहाजी राजांना हा प्रकार कळताच त्यांचे पित्त खवळले. जिजाईचे वडील हे आपले सासरे, त्यांचा झालेला खून त्यांना सुन्न करून गेला. सासऱ्यांशी भांडण होते, पण वैर नव्हते. वैरही आता ओसरत चालले होते. अशावेळी सासऱ्याचा खून कपटाने व्हावा ही गोष्ट त्यांच्या मनाला खूप लागली. त्यांचे तरुण रक्त सळसळले. ते परांड्याहून त्वेषाने निघाले आणि त्यांनी संगमनेर मार्गे पुण्याकडे दौड ठोकली. पत्नी जिजाई व पुत्र संभाजी बरोबर होते, त्यांना त्यांनी वाटेत जुन्नरास शिवनेरी किल्ल्यावर ठेवले.

राजांनी विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यातला पुण्याच्या परिसरातला प्रदेश जिंकून ताब्यात घेतला. यवनी सरदारांना पळवून लावले आणि तो प्रदेश स्वतंत्र केला. कुंभारवेस, मावळवेस, केदारवेस स्वाभिमानातं स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी पहारा देऊ लागल्या. वेशीवेशीवर भगवे फडकू लागले. काही काळ का होईना या परिसरानं स्वातंत्र्याचा श्वास घेतला.

पुणे स्वतंत्र करून शहाजी राजे शिवनेरीवर आले आणि जिजाईच्या डोळ्यातून राजांच्या पराक्रमाने आनंदाश्रू ओघळू लागले होते.

■

# ३. शिवजन्म आणि बालपण

वडिलांच्या आणि भावांच्या भीषण खुणानंतर जिजाई अतिशय दुःखी झाली होती. याच सुमारास तिला दिवस गेले होते. पती शहाजीराजाची बंडखोरी तिच्या काळजीत भर टाकणारी होती. महाराष्ट्राच्या काही भागात त्यावेळी भीषण दुष्काळाची छाया पसरली होती. एकूण जिजाई कठीण दिवसातून जात होती. मात्र ती मनाने खंबीर होती. त्यामुळे ती डगमगली नाही वा खचली नाही. शहाजी राजांवर तिची पूर्ण निष्टा होती, विश्वास होता.

शिवनेरीवर त्यावेळी विजयराज नावाचा किल्लेदार होता. त्याला जयंती नावाची मुलगी होती. जिजाईचा मोठा मुलगा संभाजी आता आठ वर्षाचा झाला होता. म्हणजे त्याचे लग्नाचे वय झाले होते संभाजीचे लग्न याच धामधुमीत उरकण्यात आले. या लग्नसंबंधामुळे शहाजीराजांची एक मोठी काळजी मिटली. राजे खानदेशात दर्याखानावरील स्वारीवर निर्धास्तपणे निघून गेले विजयराजांनी शिवनेरीवर जिजाईंची उत्तम व्यवस्था ठेवली होती.

आणि एक दिवस जिजाईचे मनोरथ पूर्ण झाले. शालिवाहन



शके १५५१ फाल्गुन वद्य तृतीयेस (१९ फेब्रुवारी १६३०) सूर्यास्तानंतर थोड्यावेळाने सिंह लग्नावर जिजाई प्रसूत झाली आणि तिने पुत्ररत्नाला जन्म दिला.

शिवनेरी किल्ल्यावर शिवाई देवी होती. जिजाई नेहमी या देवीची प्रार्थना करीत असे. पराक्रमी पुत्र होण्यासाठी तिने शिवाई देवीस नवसही केला होता. शिवाई देवी नवसाला पावली म्हणून पुत्राचे नाव शिवाजी ठेवण्यात आले (पुत्राचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला, त्यामुळे तिथं जन्मलेल्या मुलाचे नाव शिवाजी ठेवले ही शक्यताही नाकारता येत नाही) पुत्र जन्मानंतर पुराणिक बाबांकडून शुभ दिवस पाहिला गेला आणि ते कान्तिमान, हसतमुख गोंडस बालक पाळण्यात घातले गेले. तेव्हा साखर वाटण्यात आली आणि पाळणा म्हटला गेला त्याचे बोल होते-

जो जो जो जो रे । शिवराया
सुख पावो तव काया । जो जो जो जो रे

शिवजन्मापासून शहाजीराजांचे जीवन संघर्षाचे व्यापून गेले होते.

त्यांचा पराक्रम आणि ऐश्वर्य वाढू लागले, त्याचबरोबर संकटंही येऊ लागली. शिवजन्माच्यावेळी राजांच्या पुणे प्रांतात विजापुरी सरदारने धुमाकूळ घातला. शहाजी राजांनी त्याला आवरण्यासाठी मोगलाची पंचहजारी मन सबदारी पत्करली. निजामशाहीतही बेदिली माजली. मोगलानी निजामशहाचा वजीर फत्तेखानला जवळ केले आणि शहाजीची मनसब काढून घेतली. मानी राजे भडकले आणि त्यांनी जुन्नर नजीक पेमगिरी इथे नवीन निजामशाही स्थापन केली. निजामशाही मोडल्यानंतर मोगलानी आपला मोर्चा शहाजीराजांकडे वळवला. राजांनी मोगलाच्या फौजेस तीन वर्षे झुंज दिली. अखेर सामर्थ्य कमी पडून माहुलीच्या किल्ल्यात आश्रय घेतला आणि शेवटी निरुपाय झाल्यानंतर त्यांना मोगलांबरोबर तह करावा लागला. तहाप्रमाणे राजांना आपल्या जहागिरीचा मुलुख वगळून इतर सर्व किल्ले व प्रदेश मोगलाना द्यावा लागला.

त्यानंतर शहाजी राजे आदिलशहाकडे विजापुरास गेले. शहाने त्यांना सन्मानाची वागणूक दिली आणि मोठा हुद्दा देऊन त्यांच्या पराक्रमाचा उपयोग करून घेतला. राजेसुद्धा धावपळीला आता कंटाळले होते, परक्याची चाकरी त्यांना अटळ दिसू लागली. विजापुरला जाण्यापूर्वी राजांनी पुणे-सुपे येथील आपल्या जहागिरीची व्यवस्था दादोजी कोंडदेव यांच्यावर सोपवली आणि ते निर्धास्तपणे विजापुरास गेले. विजापुरच्या दरबारी राजांचा भाग्योदय उत्तरोत्तर वाढत गेला. त्यांच्या पराक्रमावर आदिलशहाने बंगळूरचा किल्ला व प्रदेश राजांना जहागीर म्हणून बहाल केला. विजापूर दरबारातील एक बडे सरदार म्हणून शहाजी राजे ख्यात झाले.

माहुलीच्या वेढ्यापर्यंत जिजाई व बालशिवबा यांची पहिली सहा वर्षे शिवनेरी दौलताबाद, अहमदनगर, पेमगिरी आणि माहुली या ठिकाणी गेली होती. त्यातही शिवनेरी, पेमगिरी व माहुली या

तीन ठिकाणी त्यांचे वास्तव्य अधिक असायचे. शिवबा लहानपणी अतिशय अवखळ होते. घराबाहेर केव्हा पडेल आणि कुठे कुठे जाईल याची मातेला नेहमी चिंता वाटे. वडील शहाजीराजे नेहमी स्वारीवर. त्यामुळे शिवबाला मातेशिवाय जवळचे मायेचे माणूस नव्हते. तसा घरी थोरला भाऊ संभाजी होता पण दोघांमध्ये सहा-सात वर्षांचे अंतर होते. त्यामुळे जिजाई हेच शिवबाचे सर्वस्व होते. लाड करणार आई, खेळवणार आई, भरवणार आई, अंगाई गीत म्हणणार आई, खोड्या केल्यावर मार देणार आई आणि अनुभवाचे बोल शिकवणारी आईच. त्यामुळे बालपणी आई हाच शिवबाचा एकमेव आधार होता, जिजामातेची स्थितीसुद्धा वेगळी नव्हती. मोहिमांमुळे पतिसान्निध्य तिला कमी मिळे. मग ती माऊली आपला वेळ शिवबाच्या लालनपोषणात घालवी.

शिवबाचे बालपण सह्याद्रीच्या झाडांनी हिरव्यागार आणि कातळानी ओबडधोबड बनलेल्या परिसरात गेले. आईची नजर चुकवून तो मित्रांबरोबर बाहेर पडे. डोंगर नद्या नाले, दऱ्या झाडेझुडपे व पशुपक्षी यांच्या सान्निध्यात त्याचे बालपण मोठ्या आनंदात सरत होते. घरी आल्यावर तो जिजामातेच्या तोंडून पराक्रमी आजोबांच्या व वडिलांच्या शौर्याच्या गोष्टी ऐकत होता. रामायण-महाभारतामधल्या काही कथाही माता त्याला ऐकवत असे. तोही एकाग्रपणे सारे ऐकत असे. आपले दुःख विसरून जिजाई त्याला शिकवत होती आणि छोटा शिवबा खेळत खेळत वाढत होता.

माहुलीच्या पाडावानंतर शहाजी राजे कुटुंबासह विजापुरला आदिलशहाकडे गेले. त्यांच्या कुटुंबात जिजाबाई, तुकाबाई व नरसाबाई अशा तीन स्त्रिया आणि संभाजी, शिवाजी, तुकाबाईचा मुलगा एकोजी आणि नरसाबाईचा मुलगा संताजी हे चार पुत्र अशी एकूण आठ माणसे होती. राजे स्वतः धार्मिक वृत्तीचे आणि गुणीजनांचे आश्रयदाते



होते. मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी शास्त्री पुराणिक व पंतोजी ठेवले होते. सर्व मुलांना स्मृति-पुराणे भागवत रामायण-महाभारत आदी पौराणिक ग्रंथांतील सुरस व प्रेरणादायी कथा ऐकवल्या जात. त्याचबरोबर मुलांना मर्दानी खेळ शिकवले जात. शिवबा सातव्या वर्षापासून लिहू लागले. त्याचे लिहिणे जलद व अक्षर वळणदार असे. शब्दोच्चार स्पष्ट असत. इतर मुलांच्या साथीने त्यांनी हत्ती घोड्यावर बसणे, तलवार भाला पट्टा व धनुष्य चालविणे, गडकोट चढणे, कुस्ती मारणे, विष उतरविणे, रत्न परीक्षा करणे इत्यादी विद्या व कला खूप जलदरितीने आत्मसात केल्या. जिजामातेचे शिवबावर विशेष लक्ष असे.

१६३९ साली बंगळूरची जहागिरी मिळाल्यावर राजे आपल्या कुटुंबासह तिकडे गेले. शहाजी राजांच्या आयुष्यात स्थिरता व ऐश्वर्य असल्यामुळे त्यांनी आपल्या जहागिरीची व्यवस्था लावण्याचे पक्के केले. त्याप्रमाणे त्यांनी पुण्या-सुप्याची जहागीर शिवबांच्या नावे करून

त्यांना जिजाईसह पुण्यास पाठवले. शिवबा वयात येईपर्यंत जहागिरीची व्यवस्था दादोजी कोंडदेव पाहणार होते. त्यांच्या मदतीला काही कारभारी नेमले होते.

जिजामाता व शिवाजी पुण्याकडे आले ते प्रथम सिंहगडजवळ कसबे खेड इथे राहू लागले. नजिकच्या गडावर दादोजी कोंडदेवांचे वास्तव्य होते.

पुणं पुरतं बेचिराख झालं होतं, ते परत वसवणं आवश्यक होतं. दादोजींनी शहाजी राजांच्या आज्ञेने पुण्यात कसबापेठेत लालमहाल नावाचा एक मोठा वाडा बांधला. या वाड्यात माय-लेकरांचा अधून मधून मुक्काम असे. याच सुमारास जिजाईना ढिगाऱ्याखाली गणेशमूर्ती सापडली. जिजाईने त्याचजागी कसबा गणपतीचे मंदिर उभारले. शाहबाग, जिजापूर, शिवापूर, लालमहाल कसबा मंदिर अशा एकेक वास्तू उभ्या राहताना शिवबा पाहत होते. त्यांना नवी दृष्टी येत होती.

पुण्या भोवतालचा घनदाट जंगलाचा प्रदेश हा काटकआवळ्यांचा प्रदेश मानला गेला होता. विश्वासू, प्रामाणिक आणि जिवास जीव देणारी ही जात म्हणून प्रसिद्ध होती. या गरीब जनतेतूनच जिजाईना नवे लढवय्ये सरदार तयार करायचे होते. जिजाईनं गाव सोडून गेलेल्या पाटील, मोरे, कुलकर्णी, चौगुले, चौधरी, देशमुख मंडळींना सदरेवर बोलावून त्यांचा गौरव केला आणि शिवबाच्या नावे कारभार सुरु केला.

जिजाई जातिनिशी प्रत्येकाची समस्या सोडवत होती आणि त्यांचा विश्वास संपादन करीत होती. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करीत होती. श्रीरामाने वानरांना हाती धरलं तसं जिजाईनं मावळ्यांना साथी घेतलं होतं. जिजामातेची प्रत्येक कृती शिवबा पाहत होता आणि त्याचं कुतूहल चाळवत होतं. एकदा त्यानं जिजाईला विचारलं, ‘विजापूरचे

आदिलशहा जर इथले बादशहा आहेत तर हे आपण कां करायचं?' त्यावर जिजाई उत्तरली, 'शिवबा, ते बादशहा असले तरी रयत आपली आहे. राज्यकर्त्यांनी आपल्या प्रत्येक कृतीत त्यांच्यात विश्वास निर्माण करायला हवा. कृती बोलते, शब्द नाहीत. राजे...'

'मग आपण वसुली करतो. न्याय निवाडा करतो तो कसा?' शिवबाची शंका

यावर जिजाई म्हणाली, 'राजे राज्य करणं म्हणजे नुसती करवसुली न्यायनिवाडा करणं नव्हे. प्रजेची समृद्धी आणि संरक्षण हे महत्वाचं आहे. राजाच्या थोरवीमुळं सिंहासन थोर होत असतं हे लक्षात ठेवा.'

अशा एकेक प्रसंगातून, जिजाईच्या मार्गदर्शनातून शिवबा कारभाराची तंत्र मंत्र शिकत होते.

स्वराज्य मिळवण्यासाठी शिवबाला एक समर्थ शूर पराक्रमी ध्येयासक्त मुत्सद्दी राज्यकर्ता बनवणं आवश्यक होतं. त्यासाठी जिजाईनं लाल महाला शेजारी नदीकाठी मोठमोठे आखाडे तयार करवून घेतले. कसलेले मल्ल, तलवारपट्टू, पट्टा चालवणारे कसबी शिक्षक आणवले आणि तिथे शिवबाबरोबर अनेक तरुण मावळे अविरत अंग मेहनत करु लागले.

शिवबा दहा वर्षाचे झाले. एकदिवस फलटणचे राजे मुधोजीराव निंबाळकर (पवार) वाड्यात आले त्यांच्याबरोबर कन्या सईबाई होत्या. सईबाईला पाहताच जिजाईच्या मनात त्या भरल्या. शिवबासाठी ती अगदी योग्य वधु होती. जिजाईनं मुधोजीना विचारलं, 'सई आम्हाला शिवबासाठी द्यालं?'

मुधोजींना आनंद झाला. त्यांनी लगेच होकार दिला आणि शिवबा-सईच्या लग्नाची तयारी झाली. शहाजीराजांना बंगलोरी खलिता गेला. जिजाईंच्या मदतीसाठी लक्ष्मीबाई, अक्कासाहेब आल्या. मांडव

पडले. गावात उत्साह संचारला पण लग्नाला शहाजीराजे येऊ शकले नाहीत. लग्नात तेवढंच न्यून राहिले.

लग्न सोहळा पार पडला आणि सई जिजाईची सून म्हणून लक्ष्मीच्या पावलांनी वाड्यात प्रवेश करती झाली.

■

# ४. शिवबांचा पराक्रम प्रारंभ

शिवबाच्या हाती एल्गाराची मशाल देऊन शिवबासह जिजाईनं ज्ञानोबांच्या समाधीवर स्वराज्याची शपथ घेतली आणि तेरा-चौदा वर्षाच्या शिवबांना घेऊन तिनं एका प्रचंड महायज्ञाला प्रारंभ केला. जिजाई शिवबांना घेऊन न्यायनिवाडे करू लागली. निर्णायिकी जहागिरीला नायक मिळाला होता.

अंतर्यामी स्वातंत्र्याची ठिणगी घेऊन जिजाई शिवबाला घेऊन मावळातल्या घराघरात फिरली, त्यांची सुख दुःखे समजूत घेतली. यवनी अत्याचाराचा तिरस्कार आणि स्वातंत्र्याचं लोण तिनं प्रत्येक घरात पोहोचवलं.

पाहता पाहता सारा मावळ प्रांत पेटून उठला. महायज्ञाला समीधा मिळाल्या. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, सूर्याजी काकडे, बाजी पासलकर, त्रिंबक सोनदेव, बापूजी मुद्गल, नारोजी नव्हेकर, चिमणजी नऱ्हेकर, बाळाजी नऱ्हेकर, जिवा महाले, सूर्याजी मालुसरे, वाघोजी तुपे असे कित्येक तरुणवीर तळपायावर शिर घेऊन उभे राहिले.

नवरात्रीच्या घटस्थापनेच्या दिवशी शिवबा आपल्या मावळ्या सवंगड्यांसह रोहिडेश्वरी आले घंटानादाच्या निनादात सर्वांनी स्वराज्याच्या शपथा घेतल्या.

जहागिरीच्या प्रदेशातील मावळ भाग शिवबाच्या चांगला परिचयाचा झाला होता. कारभार सुधारणे, समाजनिरीक्षण करून संघटना उभारणे, बळ वाढविणे आणि मग स्वराज्याची चळवळ उभारणे अशा क्रमाने त्याची पावले पडू लागली. १६४६ साली तानाजी मालुसरे आणि बाजी पासलकर ह्यांनी शिवबाच्या मार्गदर्शनाखाली तोरणा किल्ला घेतला आणि शिवबाने आदिलशाही विरुद्ध बंडाचे निशाण उभारले. पुढच्या वर्षी कोंडाणा व पुरंदर हे किल्ले घेतले. कारण 'संपूर्ण राज्याचं सार ते दुर्ग' हे त्यांच्या राजनीतिचे आरंभापासून मुख्य सूत्र राहिले.

शिवबा आता शिवबा राजे झाले.

कोंडाणा पुरंदर किल्ले घेतल्यानंतर चार-सहा महिन्यांनी दादोजी कोंडदेवांचे निधन झाले (१६४७). आता जिजामाता शिवबांना अडीअडचणीला सल्ला मसलत देऊ लागल्या. शिवाजीराजांनी किल्ले घेतल्यावर विजापूर दरबारात साहजिकच खळबळ माजली. शहाजी राजे विजापूरकरांचे चाकर असताना त्यांच्या मुलाने बंडखोरी करून दरबाराचे किल्ले ताब्यात घ्यावेत या गोष्टीचा आदिलशहाला भयंकर राग आला. शिवबाला वेसण घालण्यासाठी आदिलशहाची वक्रदृष्टी त्याच्या आप्तेष्टांकडे वळली. अंबरखान अचानक फलटणवर चाल करून गेला आणि त्याने शिवाजीचे सासरे मुधोजीराव निंबाळकरांवर हल्ला केला. मुधोजीराव पडले आणि मुलगा बजाजीस कैद करून त्याला मुसलमान करून सोडले. निंबाळकर घराणं धुळीला मिळालं. सईचं दुःख शिवबाराजांना पाहवेना. त्यांच्या डोळ्यात आसवे आली आणि ते म्हणाले, 'जवळच्या नातलगांची राखरांगोळी पाहवत नाही.' त्यावर जिजाई धीर देत शिवबाना म्हणाल्या, 'राजे आमचं माहेर-सासर एकदा यवनांच्या पायी उध्वस्त झालं. अनेक घराणी धुळीला मिळाली. धीरानं तोंड द्या. त्यातच खरा पुरुषार्थ असतो.' शेवटी त्या म्हणाल्या, 'राजे तुम्ही मांडलेल्या या यज्ञात अशा अनेक समीधा

पडणार आहेत. तुमच्या भावभावनांच्या अश्रूंनी हा यज्ञ विझू देऊ नका...इतकंच.'

शिवबांच्या अशा पुंडगिरीबद्दल एकदा आदिलशहाने शहाजींना जाब विचारला. 'मुलगा माझं काही ऐकत नाही' असं म्हणत त्यांनी कानावर हात ठेवले. शहाजीराजांबद्दल आदिलशहाच्या दरबारात आधीच मत्सर, द्वेष धुमसत होता. राजांचा पराक्रम आणि दिला गेलेला दर्जा दरबारातील मुसलमान सरदारांना पाहवत नव्हता. त्यातून राजे पडले हिंदू. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध आदिलशहाकडे तक्रार करणे सहज शक्य आहे. कर्नाटकातील हिंदू राजे-रजवाड्यांबद्दल राजांना वाटणाऱ्या आपुलकीचा विपर्यास करून राजांच्या हितशत्रूंनी त्यांच्याविरुद्ध आदिलशहाचे कान फुंकले. त्या सर्वांनी 'शहाजी राजे बडे करू पाहतात' अशा कंड्या पिकवण्यातही कमी केले नाही. आता आदिलशहाचा संशय बळावला. त्याने राजांच्या अटकेचा हुकूम दिला.

आदिलशहाच्या हुकूमाप्रमाणे पहाटेच्या झिळमिळत्या प्रकाशात मुस्तफाखानानं बाजी घोरपडे आणि इतर अनेक हिंदू तसेच मुसलमान सरदारांना गुप्तपणे शहाजीराजांच्या गोटात पाठवले. आपल्या छावणीत राजे साखरझोपेत होते. राजे जागे झाले तो चकमकी सुरु झाल्या होत्या. खुद्द राजांवर बाजी घोरपडे चालून आला. उभयतांमध्ये चांगली झुंज झाली. राजे जखमी होऊन कैदी झाले. राजांचे विश्वासू हस्तक कान्होजी जेधे ह्यांनासुद्धा कैद करण्यात आले. सर्वांना बेड्या घालून विजापुरात आणण्यात आले आणि विजापुर दरबारच्या या महान मानकऱ्याची विजापुरच्या रस्त्यानं हत्तीवरून धिंड काढण्यात आली.

शहाजी राजे कैद झाल्याची बातमी कळताच जिजाई अतिशय दुःखी झाल्या. चेहरा काळवंडला रात्रभर हृदयाचा ठोका चुकला. जिजाईनं शिवबाला हाक मारली,

'शिवबा राजेऽऽ'

'जी मासाहेब...'

शिवबा त्या मानान खूप शांत दिसत होते. चेहऱ्यावर भीतिचा लवलेश नव्हता. तर आत्मविश्वासाचं वलय दिसत होतं.

'राजे, शहाजी राजेंना कैद झाली आहे. तुम्ही काय विचार केलात?'

दक्षिणेचा मोगल सरदार शहाजादा मुराद याला लिहिलेला खलिताच राजांनी जिजामातेसमोर ठेवला. त्यात लिहिलं होतं...

'आम्ही स्वदस्तुर खुद्द आमच्या मुलखासह आपल्या चाकरीत येण्यास तयार आहोत. आदिलशहानं कपटानं आमच्या पिताश्रींना कैद केली आहे. तरी आपली मदत मिळावी.'

त्या तणावपूर्ण स्थितीतही जिजाईच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. त्या म्हणाल्या,

'शिवबा डाव तुम्ही मोठ्या हुशारीनं टाकला आहे. या खलित्याचा परिणाम नक्की होईल.'

'मातोश्री आदिलशहा एक डाव खेळला. आम्हीही त्याला दुसरा डाव खेळून उत्तर देत आहोत. यश देणं श्री जगदंबेच्या हाती आहे.'

मोगलबादशहा शहाजहानचा खरमरीत तंबी देणारा खलिता आदिलशहाकडे आला. आदिलशहाची कोंडी झाली. तब्बल दोन वर्षांनी शहाजी राजांची सुटका झाली होती.

स्वराज्यावर आणि जिजाईंच्या कुंकवावर आलेले यवनी संकट श्रींच्या कृपेनं सरलं होतं. सतत दोन वर्षे मनावर पडलेला ताण सैल झाला. जिजामातेचं मन शांत झालं.

तिकडे विजापुरात शहाजीराजांना राहून राहून आश्चर्य वाटत होते. पण लवकरच त्यांना सर्व गोष्टींचा उलगडला झाला. शिवाजी आणि संभाजी या त्यांच्या दोन पुत्रांनी मिळून शतरंजचा सारा डावच उलटा केला होता. राजांच्या मनात पुत्रांच्या कौतुकाच्या, अभिमानाच्या,

आनंदाच्या आणि धन्यतेच्या अनंत उर्मी उचंबळून आल्या. ‘खरोखर फर्जंद असावेत तर असे’ राजांच्या मनात आले.

शहाजीराजे दरबारात आल्यावर पातशहाने हसून म्हटले, ‘आप तो तख्त का चाँद है, सितारा है।’

आदिलशहाने त्यांना त्यांच्या जहागिरीतील बंगळूर शहर, कंदर्पी किल्ला आणि शिवाजीने जिंकलेला कोंडाणा किल्ला परत करण्यास सांगितले.

जिजाई मनातल्या मनात खूष झाल्या. तिचे पराक्रमी पुत्र शिवबा व संभाजी यांनी जाणकारीने योग्य निर्णय घेतला होता. आणि मराठेशाहीवरील एक संकट टळले होते.

■

# ५. जिजाईचा कारभार

शिवाजी राजे सतत मोहिमांवर असायचे. पुत्र शिवबाचा सगळीकडे पराक्रम चालू असता जिजामाता कारभाराकडे आणि जनतेच्या अडीअडचणींकडे जातीने लक्ष पुरवित असायच्या. सर्वसामान्यांना दिलासा देत असायच्या. या संदर्भात इ. स. १६५२-५३चे जिजाईचे एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात गणो अबाजीला तिने 'जमीन इनाम अमानत न करता पूर्वी प्रमाणे चालू ठेवणे' असे फर्मान दिले आहे. विशेष म्हणजे चिरंजीव शिवबाने 'इनाम अमानत करण्याबद्दल' लिहिले असताही तिने त्याचा निर्णय फिरवला आणि आपल्याला योग्य वाटला म्हणून स्वतः नवा हुकूम जारी केला. या पत्रावरून हे स्पष्ट होते की, कारभारात जिजामातेचे केवढे वजन होते आणि राज्याचा कारभार ती स्वतः आपल्या बुद्धिनुसार कसा व्यवस्थित करीत होती.

समाजाविषयी, जनतेविषयी तिला कळकळ, प्रेम होते आणि हे केवळ वरवरचे दिखाऊ नव्हते तर प्रामाणिकपणाचे होते. केवळ उक्ती नव्हे तर प्रत्यक्ष कृती करण्यावर तिचा भर होता आणि त्यामधून राज्याच्या कारभारात तिने समाजसुधारणेंचा आणि धर्मसहिष्णुतेचा कसा

आदर्श घालून दिला होता याची अनेक उदाहरणे सांगता येतात. असे एक उदाहरण खूप बोलके आहे.

बजाजी निंबाळकर हे पूर्वापार आदिलशाहीतील एक प्रतिष्ठित जहागिरदार. बजाजी हा शिवबा राजांचा मेहुणा म्हणजे पत्नी सईबाईचा सख्खा भाऊ. एकदा अंबरखानाने चाल करून त्याला कैद केले. त्याच्या गळ्यात साखळदंड ठोकण्यात आले आणि जुलमाने त्याचा धर्म बदलण्यात आला, त्याला मुसलमान करण्यात आले होते. त्यामुळे तो कष्टी झाला होता, मनोमन दुःखी होता. एकदा जिजाई शिखर-शिंगणापूरच्या दर्शनासाठी (१६५१ साली) गेल्या असता त्यांनी बजाजीला बोलावून घेतले आणि शास्त्राप्रमाणे त्याला हिंदू करून घेतले पण हिंदू करून घेतल्याने बजाजीला समाज प्रतिष्टा देईलच याची त्यांना खात्री नव्हती म्हणून त्यांनी काय करावे? त्या काळाच्या खूप पुढे नेणारा निर्णय त्यांनी विचारांती घेतला. जिजामातेने आपली नात (शिवबा-सईबाईची मुलगी) सकवारताई उर्फ सखूबाई बजाजीचा मुलगा महादजी यास देऊ केली आणि त्याप्रमाणे त्यांचे लग्न घडवून आणले. अशा प्रकारचे सुधारणेचे सामाजिक कार्य घडविण्यात जिजामातेने त्या काळी जे धैर्य व मनाचा खंबीरपणा दाखवला त्याला खरोखर तोड नाही हेच खरे!

शिवाजी राजांची आपल्या मातुश्री जिजाईबाईंवर अपार निष्टा होती. आपले कल्याण चिंतणारी तीच आहे हे त्यांना पक्के ठाऊक होते. त्यामुळे मातेला दुखवण्याचा विचार त्यांच्या मनात कदापी आला नाही उलट ती सांगेल त्याप्रमाणे ते ऐकत होते आणि प्रत्येक कार्यात तिचा आशीर्वाद घेऊन मगच पुढचे पाऊल टाकण्याचा निर्णय घेत होते. तिच्या सल्ल्याविना कोणतेही नवे साहस करायचे नाही. काही बारीक सारीक तंटे निघाले तर त्यांचा निवाडा जिजाईंकडून मिटवायचा ही त्यांची पक्की धारणा होती. एकदा मंत्रोपदेश घेण्यावरून एका

वर्षी जेजुरीच्या खंडोबाच्या देवळातील गुरवांमध्ये तंटा माजला. हा तंटा राजांनी मातोश्रींकडूनच मिटवला. आईचा कौल तो आपला कौल अशा परखड शब्दात त्यांनी त्यावेळी निवाडा केला होता.

जिजामातेवर शिवाजी राजांची श्रद्धा अशी जबर की, कोणाला शब्द देताना 'मातृश्रीं साहेबांच्या पायाची आण असे' या शब्दात ते स्वतःला गुंतवून घेत असत. अशा अनेक प्रसंगांमधून मायलेकरांच्या इच्छा, आकांक्षा आणि हालचाली इतक्या एकरुप होत चालल्या की जणू सुईमागून दोरा. आणि त्यामुळे स्वराज्याचे महावस्त्र भराभर विणले गेले ते दोघांच्या अशा एकरुप झालेल्या आकांक्षा व हालचालींमुळे.

जिजामाता आणि शिवाजी राजे यांच्या स्वभाववैशिष्ट्यांवर, नाते संबंधावर प्रकाश टाकणारा एक प्रसंग मोठा बोलका आहे तो म्हणजे शिवाजी राजांनी संपवलेले जावळीच्या चंद्रराव मोरे यांचे बंड.

कान्होजीने गोमाजी नाईंकाच्या बरोबरीने बऱ्याच देशमुखांना स्वराज्याकडे वळवले होते, परंतु जावळीकर मोरे शिवबास जुमानीत नव्हते. मोरे तसे नात्यातले पण स्वराज्याच्या ध्येयासाठी त्यांना धडा शिकवणं आवश्यक होते. चंद्रराव काही ना काही कुरापती काढून शिवाजीराजांना त्रास देत होता. शिवबांच्या प्रदेशात घुसखोरी करून मोरेनं चिखलीच्या रामजी पाटील ह्याला ठार केले, जावळी खोऱ्या नजीकच्या शेतकऱ्यांना धमक्या दिल्या.

शिवबानं मोरेना सांगून पाहिलं, समजावलं. पण मोरे काही ऐकण्यापलिकडे गेले होते, स्वतःच्या मस्तीत, गुर्मीत होते.

मुजोर चंद्रराव मोऱ्यांनी खलिता पाठवला आणि त्यात लिहिले– 'तुम्ही स्वतःस राजे समजता, तुम्हाला राज्य कुणी दिलं? जावळीला जरुर या, भरपूर दारुगोळा मौजुद आहे. तुमचा एकही मावळा जिवंत परत जाणार नाही. ध्यानात ठेवा.'

शिवबा राजेना राग अनावर झाला. ते त्या तिरमिरीत

जिजामातांकडे गेले.

'मासाहेब, आमचे हात, नात्यात अडकले आहेत. नाहीतर मोरे असे उर्मट वागले नसते.'

जिजामाता म्हणाल्या, 'राजे, आता आपण मोठे झालेला आहात. आपले निर्णय आपणच घ्या, आखा आणि नंतर आमच्या कानावर घाला. आमच्याशी मतभेद झालाच तर स्वतःच्या मनोदेवतेला साक्षी ठेवून वागा'

'तरीही मासाहेब, ही आपली माणसं. त्यांच्या विरुद्ध हत्यार...'

'राजे, तुमचा मार्ग कठीण आहे. अगदी जावळीच्या अरण्याहून बिकट आणि लक्षात ठेवा राजाला नाती गोती नसतात. त्याचा एकच धर्म आणि तो म्हणजे राजधर्म. प्रजेचं राज्याचं संरक्षण आणि संवर्धन.'

शिवबांना जिजाईंकडून उत्तर मिळालं. निर्णय पक्का झाला.

शिवबांनी साथीदारांना घेऊन जावळीला वेढा दिला. तुंबळ लढाईत यशवंतराव ठार झाला. तर चंद्रराव मोरे रायरी किल्ल्यावर पळून गेला. प्रतापराव आदिलशहाला मिळाला आणि जावळी राजांच्या ताब्यात आली.

राजांचे सरदार चंद्ररावांशी वाटाघाटी करीत होते. परंतु चंद्रराव ऐकत नव्हता. शेवटी राजाने रायरी किल्ल्यावर हल्ला केला आणि चंद्रराव आणि त्याच्या दोन पुत्रांना अटक केली. या उपरही चंद्ररावाचा माज उतरत नव्हता. तो गुप्तपणे आदिशलहाचे बाजी घोरपडेशी संधान साधून आहे, हे जेव्हा राजांना कळले त्यांचा राग मस्तकात गेला. डोळे आग ओकू लागले. त्यांचा हात समशेरीवर पडला आणि काही कळायच्या आत चंद्रराव आणि त्यांचे दोन पुत्र बाजी व कृष्णराव ठार झाले.

जिजाईंना हे वृत्त कळताच त्या चक्रावल्या. त्या तडक राजांकडे आल्या आणि त्यांना म्हणाल्या, 'त्या पोरानी तुमचं काय वाकडं केलं

होतं, म्हणून त्यांना ठार केलंत?'

'ती सर्पाची अवलाद...' राजे रागातच उत्तरले.

'राजे ते पराभूत होते... त्यांना तुम्ही सिंहाची जात म्हटलं असतं तर तुमचा गौरव ठरला असता. सत्ता तुमच्या डोक्यात जात असेल तर या हिंदवी स्वराज्याला काही अर्थ उरणार नाही. या देशातल्या इतर अनेक सुलतानशाहींमध्ये आणखी एकाची भर पडेल इतकंच...'

जिजामातेचा एकेक शब्द राजांवर आसूड ओढत होता. राजांना चूक उमगली, ते खजिल झाले.

'मासाहेब, चुकलो हे पुन्हा असं होणार नाही, क्षमा करा.'

जिजामातेनं शिवबांना जवळ ओढले आणि गोंजारीत म्हणाल्या,

'राजे लक्षात ठेवा. यशात कधी उन्मत्त होऊ नका आणि पराभवानं कधी खचून जाऊ नका'

अशा छोट्या छोट्या प्रसंगांतून जिजामाता शिवाजी राजांना नीतिमत्तेचे धडे देत होत्या. आणि त्यांना एक प्रगल्भ राज्यकर्ता बनवीत होत्या.

सुप्यांचा संभाजी मोहितेसुद्धा राजांची ताबेदारी मानीना. राजांनी मध्यरात्रीच्या किट्ट काळोखात त्याच्या गडावर हल्ला केला आणि मोहित्यांना कैद करून गडावर आणले. सुपे राजांच्या ताब्यात आले.

शिवाजी राजांचं राज्य वाढत होतं. लौकिक सर्वदूर पसरत होता. राज्य बाळसं धरीत होतं, सूर्यप्रभेप्रमाणे तळपू लागलं होतं. स्वराज्याच्या मनिषेने आसुसलेले अनेक तऱ्हेचे अनेक जाती-पंथाचे लोक शिवबांना साथ द्यायला येऊ लागले. शिवबांच्या हाताखाली उत्तरेच्या घोडनदीपासून दक्षिणेस अगदी साताऱ्यापर्यंत आणि कोकणात माहुलीपासून महाडपर्यंत मुलूख आला होता. तसेच राजमाची, कोंडाणा, तोरणा, लोहगड, रायरीसारखे चाळीस किल्ले आणि गड तसेच बारा

मावळ, पुणे, इंदापूर शिरवळ सुर्य इथला प्रदेश स्वराज्यात आला. राज्याच्या संरक्षण आणि बंदोबस्तासाठी नेताजी पालकरांच्या आधिपत्याखाली दहा सहस्त्र घोडदळ आणि यसाजी कंक यांच्या नेतृत्वाखाली दहा सहस्त्र पायदळ उभं राहिलं होतं. आता व्याप एवढा वाढला की राजांना वेळ पुरेनासा झाला. यवन सत्तेचे जुलमी जोखड आता गळून पडले होते, जनता आनंदली होती, मोकळा श्वास घेऊ लागली होती. मोरोपंत पिंगळे, पेशवा, निळो सोनदेव मुजुमदार, सुरनीस आणि वाकनीस अशा नेमणुका झाल्या. राजे जेव्हा मोहिमांवर जात तेव्हा कारभार जिजाईंच्या मार्गदर्शनाखाली सुरू राहत होता; लोकांना न्याय मिळत होता.

दरम्यान कुटुंबात एक दुर्घटना घडली. साधारण इ. स. १६५५ च्या सुमारास जिजामाता आणि शिवाजी राजे यांच्यावर मोठी आपत्ती अचानक कोसळली आणि ती म्हणजे थोरला पुत्र संभाजी याच्या आकस्मित निधनाची. यावेळी संभाजी राजे सुमारे बत्तीस वर्षांचे होते संभाजी नेहमी शहाजी राजेंबरोबर असे. प्रारंभी राजांबरोबर राहून त्याने अनेक लढायांमध्ये पराक्रम गाजवला होता. त्यानंतर तर तो अनेक लढाया स्वतंत्र लढू लागला होता आणि त्यामध्ये स्वकर्तृत्वावर पराक्रम गाजवू लागला होता. जिजामाता छोट्या शिवबाला घेऊन कारभार पाहण्यासाठी पुण्यात आल्या. त्यामुळे त्याचा फारसा सहवास त्यांना लाभला नाही. असे असले तरी प्रत्येक मातेप्रमाणे त्यांचे आपल्या थोरल्या पुत्राच्या हालचालींकडे आणि तो करीत असलेल्या पराक्रमाकडे बारीक लक्ष असे. संभाजीच्या पत्नीचे नाव होते सखूबाई. उभयतांना १६५४ साली पुत्ररत्नाचा लाभ झाला होता. त्याचे नाव ठेवले होते उमाजी. एकूण सारे कसे सुरळीत चालू होते. पण दैवात काही वेगळेच लिहिले होते. कनकगिरीत अचानक बंडाळी निर्माण झाली आणि ती मोडण्यासाठी आदिलशहाकडून संभाजीची रवानगी करण्यात आली.

त्यावेळी अफझलखानसारखा मोठा सरदार संभाजीबरोबर होता. ही बंडाळी मोडत असताना अपघात घडला. अचानक तोफेचा गोळा संभाजीला लागला आणि त्यात त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. अफझलखानाचे आणि शहाजीराजांचे संबंध चांगले नव्हते. पुढे अशी एक शक्यता वर्तवली गेली की, लढाईच्यावेळी संभाजीचा अफझलखानाशी काही तंटा झाला आणि त्यामुळे संभाजीला त्याने लढाईच्यावेळी नीट मदत केली नसावी. शहाजी राजांना या घटनेचे खूप दुःख झाले जिजामातेला सुद्धा जेव्हा या प्रकरणाची सर्व हकिगत समजली तेव्हा परमावधीचे दुःख झाले आणि खानाच्या हेतुंविषयी मनात शंका निर्माण होऊन, त्याच्याविषयी विलक्षण तिटकारा निर्माण झाला.

परंतु कधीकधी विचित्र योगायोग घडतात. जिजाईच्या बाबतीत तसेच घडले. थोरला पुत्र संभाजीचं लढाईत अकस्मात निधन झालं आणि त्याचा पुनर्जन्म वाटावा असा दुसरा पुत्र कुटुंबात आला. त्याचे असे झाले. संभाजीच्या वीर मरणानंतर दीड दोन वर्षानी शिवबांची पत्नी सईबाई पुरंदर किल्ल्यावर प्रसूत झाली आणि तिने मुलाला जन्म दिला (१४ मे १६५७) शूर चुलत्याची आठवण कायम रहावी म्हणून त्याचे नाव संभाजी ठेवण्यात आले. शिवबांचा हा पहिला मुलगा जिजामातेचा अतिशय लाडका होता. सईबाई त्यावेळी खूप अशक्त झाल्या होत्या. आणि बाळंतपणानंतर त्या लगेच आजारी पडल्या प्रतापगडावर त्या माहेरी गेल्या. पुष्कळ औषधोपचार केले गेले पण गुण काही आला नाही आणि काही दिवसातच त्यांचे निधन झाले. छोटा संभाजी त्यावेळी केवळ अडीच वर्षांचा होता. आईविना या पोरक्या पोरास त्यावेळी जवळचे माणूस म्हणजे त्याची आजी जिजामाता. जिजाईने सुद्धा या लाडक्या नातवाचा खूप जिव्हाळ्यानं, मायेनं सांभाळ केला. बाळ संभाजीला आपल्या आईचं दूध काही

काळच प्यायला मिळालं. तो लहान असताना जिजामातेनं पुरंदराहून मुद्दाम एका दाईची व्यवस्था केली होती. त्याचे पिता शिवाजी राजे तर नेहमी मोहिमांवर असायचे. त्यामुळे सईबाईंच्या मागे बाळ संभाजीला त्याच्या मायाळू आणि कर्तबगार आजीने काही कमी पडू दिले नाही. पोर विलक्षण दंगामस्ती करायचे. पण आजी त्याकडे दुर्लक्ष करायची. छोट्या संभाजीकडे पाहून तिला पोटच्या दुरावलेल्या पोराची म्हणजेच शूर संभाजीची आठवण येई आणि ज्या परिस्थितीत तो मृत्यूमुखी पडला ते आठवून तिच्या जिवाची लाही लाही होई.

■

# ६. जिजामातेची चिंता

शिवाजी राजांची गरुडझेप कोकणामधून थेट कर्नाटकपर्यंत गेली. सौदे आणि बिदनूर प्रदेश स्वराज्यात आले. शिवबा जातील तिथे विजय त्यांचा हात जोडून स्वागत करीत होता. राजांच्या वाढत्या पराक्रमाने आदिलशहा अस्वस्थ झाला होता तर जुन्नर नगर लुटल्यामुळे औरंगजेब चिडला होता.

विजापूर आणि आग्राची दरबारी खलबतं एका शिवबाच्या विषयांनी रंगली होती. विजापूरचे हेजीब मोगल दरबारी दाखल होत होते तर मोगल सरदार विजापुरास भेट देत होते. दोघे संगनमतानं एक प्रचंड भयानक बेत आखत होते. शिवाजी राजांचे हेर वरचेवर त्यांना खबर देत होते.

'राजांना जीवे धरायचा किंवा जीवे मारायचा' असा विडा उचलून विजापूरहून अफझलखान प्रचंड फौजेनिशी निघाला होता. तर आगऱ्याहून औरंगजेबाचा मामा शाहिस्तेखान शिवाजीराजांचा खातमा करण्यासाठी निघाल्याची बातमी गडावर पोचली होती. स्वराज्यावर वादळ घोंघावत येत असल्याची चाहूल जिजाईला लागली होती.

जिजामातेला द्वेष्ट्या अफझलखानाविषयी खूप तिरस्कार वाटत

होता. त्याची मुख्य दोन कारणे होती. त्याने शहाजीराजे बेसावध असताना त्यांना कपटाने पकडले होते आणि त्यांची धिंड काढली होती. दुसरे म्हणजे याच क्रूर अफझलखान कनकगिरीच्या लढाईत युवराज संभाजीच्या मृत्यूस कारणीभूत ठरला होता. खान कमालीचा क्रूर व कपटी होता. सरळ सामन्यात शिवाजीला पराभूत करणे कठीण आहे हे जाणून त्याने मनात कपटी योजना आखली. विजापूरहून निघाल्यावर मराठ्यांच्या मनात भीती उत्पन्न करण्यासाठी वाटेत त्याने ठिकठिकाणी मंदिरे फोडली, लूट केली आणि सक्तीने खंडणी उकळली. खानाच्या तावडीतून त्यावेळी पंढरीचा विठोबा आणि तुळजापूरची भवानी देवीसुद्धा वाचली नाही. अफझलखानाच्या या दहशतीने लोक घाबरून गेले. खुद्द शिवाजीराजे काहीकाळ चिंतीत झाले. जिजामातेचा थोरला पुत्र लढाईत मारला गेला होता तर दुसरा पुत्र कपटी अफझलखानाला सामोरा जात होता. तिचा ऊर काळजीने भरून आला होता, आणि हे साहजिक होते. खानाचे प्रचंड सामर्थ्य आणि त्याचा कपटी स्वभाव जिजामाता जाणून होत्या.

शिवाजी राजांनी खानाबरोबरची लढाई शक्तीपेक्षा युक्तीने जिंकता आली तर पहावी असे मनाशी पक्के केले. अफझलखानाचा सामना करण्याची एक आगळी योजना त्यांच्या डोक्यात आकार घेऊ लागली होती. खानाशी सामना करण्यासाठी शिवाजी राजांनी जावळी प्रातांचा आश्रय घेतला. हा भाग डोंगराळ आणि दाट झाडीचा होता. गनिमी काव्याने लढण्यासाठी उत्तम होता, नजीकच प्रतापगडचा किल्ला होता. खानाने वाईजवळ तळ ठोकला होता. प्रथम दोन्हीकडच्या वकिलांची बोलणी झाली आणि प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखानाची व शिवाजी राजांची भेट व्हावी असे ठरले. १० नोव्हेंबर १६५९ हा भेटीचा दिवस पक्का झाला. भेटीसाठी गडाच्या पायथ्याशी एक डौलदार शामियाना उभारण्यात आला. कपटी अफझलखानाची भेट म्हणजे



शिवाजी महाराजांच्या जिवावरचा प्रसंग होता. शिवबांनी जिजामातेच्या-जवळ बसून हितगुज केले. भेटीच्या आधी राजांनी आपल्या बचावाचा पोशाख चढवला. अंगात चिलखत त्यावर अंगरखा, डोईस शिरस्त्राण वर जिरेटोप, उजव्या हाती भवानी तलवार, बाहीत बिचवा आणि डाव्या  हातात वाघनखे. भेटीला जाण्यापूर्वी राजांनी भवानी देवीची पूजा केली.

राजे गड उतरून खाली आले. बरोबर जिवा महाले होता. दुसऱ्या बाजूने खानही आला, त्याच्याबरोबर सय्यद बंडा होता.

शामियानात येताच खानाने खोटा स्नेह दाखवून आपली तलवार सेवकाच्या हाती दिली आणि शिवाजी राजास म्हणाला, ‘बेटा शरण ये. माझ्याबरोबर विजापुरास चल. तुला मोठे वैभव मिळवून देईन... असे म्हणून उंच व धिप्पाड खानाने आपले हात पसरून शिवबांना मिठीत घेतले. अचानक त्यांनी शिवबांची मान आपल्या डाव्या बाहूत पकडली. राजे आपली मान सोडवून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. राजे धडपडत असतानाच अचानक खानाच्या जमदाडीचा प्रहार

राजांच्या पोटावर बसला पण अंगातल्या चिलखतानं त्यांना वाचवलं. जिवाच्या आकांतानं राजांचा डावा हात खानाच्या पोटावर पडला आणि राजांनी बळ लावून वाघनखे खानाच्या पोटात घुसवली. खानाचं पोट चिरीत खानाचा कोथळा घेऊन ती बाहेर आली त्या स्थितीतही खानाने आपली तलवार राजांच्या डोळ्यात राग साकळला. राजांनी जवळची भवानी तलवार वर नेली आणि खानाचे डोके उडवले. रक्ताच्या थारोळ्यात खान खाली कोसळला.

खान पडलेला पाहताच खानाचा रक्षक सय्यद बंडा राजांवर चालून आला. पण राजांबरोबर असलेल्या जिवा महालेनं त्याचे सपकन दोन तुकडे केले.

अफझलखानाच्या वधानंतर तोफेच्या इशाऱ्यासरशी शिवाजी-राजांचे सैन्य खानाच्या सैन्यावर तुटून पडले. विजापुरी छावणी घेरली गेली. खानाच्या सैनिकांना पळता भुई थोडी झाली. अडीच-तीन तास मराठे शत्रूला झोडपत होते. हत्तीच्या सोंडी कापल्या गेल्या, दात तोडले गेले, उंट मारले गेले. अमाप लूट हाती आली दारुगोळा मिळाला, तोफा हस्तगत झाल्या. सोन्या नाण्यांसहित खानाच्या छावणीतून दहा लाख रुपयांचा ऐवज मिळाला. खानाचा मोठा मुलगा फजलखान निसटून गेला. पण त्याचे दोन मुलगे, भोसले व घाटगे हे फितूर सरदार व इतर बरीच मंडळी कैद झाली. बायका-मुलांना सोडून देण्यात आले. राजांच्या फर्मानाप्रमाणे गाय आणि ब्राह्मण यांना उपद्रव दिला गेला नाही.

जिजामाता देवळात दृष्टी लावून बसल्या होत्या. एवढ्यात एक दासी धावत आली आणि तिने तबकातली फुले देवीवर उधळली, तिने म्हटले, 'मासाहेब, राजे गडावर सुखरुप पोचले. स्वराज्य वाचलं नि खान मारला गेला.'

वृत्त ऐकताच जिजाईंना अश्रू आवरेनात. त्यांनी देवीच्या पायावर

डोकं ठेवलं आणि आनंद अनावर होऊन आदेश दिला, ‘गडावर नगारे झडू द्या, आनंदोत्सव होऊ द्या.’

खानाच्या वधानंतर पुढच्या लढाईची व्यवस्था करून शिवाजी राजे तातडीने जिजामातेच्या भेटीला गेले. जिजाईने शिवबाना पोटाशी धरून म्हटले, ‘राजे तुम्ही शहाजीराजांच्या अपमानाचा आणि संभाजीच्या मृत्यूचा सूड घेतलात. आमच्या डोळ्याचं पारणं फिटलं. आज आम्ही धन्य झालो.’

■

# ७. पन्हाळ्याचा वेढा

अफझलखानाच्या वधानंतर शिवाजी राजांची घोडदौड सुरू झाली. विजयापूरची पश्चिम राजधानी, विजापूरचा कौस्तुभ पन्हाळा किल्ला राजांनी युक्तीने काबीज केला. पन्हाळ्यानंतर कोल्हापूर प्रांतातले विशालगड, रांगणा, पावनगड, वसंतगड असे किल्ले राजांनी ताब्यात घेतले. पळून गेलेला फजलखान (अफझलखानाचा मुलगा) आणि रुस्तमजमा मिरजेहून फौज जमा करून राजांवर चालून आले. त्यांच्याबरोबर लढून राजांनी त्यांना पार कृष्णा नदीवर पिटाळून लावले.

शिवाजी राजांच्या कर्तृत्वाला नवे पंख फुटले होत. त्यांचा आत्मविश्वास दिवसागणिक वाढत होता. खंडणी वसूल करीत राजे थेट विजापूरपर्यंत पोहोचले आणि तिथून इतक्या वेगाने परत फिरले की कुणीही त्यांचा पाठलाग करू शकले नाही. रायबाग वगैरे समृध्द ठिकाणं राजांच्या सरदारांनी काबीज केली. विजापूर लगतचे तिकोटे, दक्षिणेकडील हुक्केरी गोकाक इथपासून गदग लक्ष्मेश्वर पर्यंतचा भूभाग नेताजींनी लुटला.

शिवाजी राजांच्या या पराक्रमाने आदिलशहा दिवसे न दिवस बेचैन होत होता. दिवसाढवळ्या त्याचे प्रांत लुटले जात होते. गड

काबीच केले जात होते. फौज पराभव पत्करून येत होती आणि तो काहीच करु शकत नव्हता. खूप विचार केल्यानंतर त्याने कुर्नूलचा पराक्रमी सरदार सिद्धी जौहर याच्याकडे धाव घेतली.

कुर्नूलचा कारभार कपटानं घेतलेल्या सिद्दीवर आदिलशहा नाराज होता. सिद्दी क्रूर होता तसेच स्वार्थी होता पण तो पराक्रमी होता. शिवाजीला अडविण्यासाठी त्याच्यासारख्या माणसाची आदिलशहाला गरज होती. त्यामुळे मान-अपमान बाजूला ठेवून आदिलशहाने त्याच्यावर शिवाजीवर चाल करून जाण्याची कामगिरी सोपवली. त्यांच्याबरोबर फाजलखान होता. रुस्तुमखान आणि भोसल्यांचा कट्टर शत्रू बाजी घोरपडे यांची त्याला साथ होती.

देश आणि कोकण प्रांत यांना जोडणारा पन्हाळा किल्ला राज्य विस्ताराच्या दृष्टीने महत्वाचा होता. म्हणून शिवाजी राजांनी दूरदृष्टीने तो आपल्या ताब्यात आणला होता. या गडावरच त्यांचे वास्तव्य होते.

सिद्दी जौहरच्या नेतृत्वाखाली विजापुरी फौज प्रचंड तयारीनिशी पन्हाळ्यावर चालून आली आणि पन्हाळ्याला वेढा दिला गेला (२ मार्च १६६०).

महाराष्ट्राचा राजा शत्रूच्या मगरमिठीत सापडला. जिजामातेचे प्राण पन्हाळ्यावर गुंतून पडले. चैत्रापासून आषाढापर्यंत जवळपास चार महिने वेढा पडला होता. शत्रू हरेना की राजे शरण येईनात. किल्ल्यावरील दारू गोळा व अन्नसाठा हळूहळू संपत आला. शत्रूचे सामर्थ्य अफाट होते. शिवाजीराजे व त्यांचे सैनिक मोठ्या विवंचनेत पडले. बाहेरून मदत मागवली परंतु तीही वेळेवर येईना. इकडे पुण्याच्या बाजूस मोगल सरदार शाहिस्तेखान मोठे सैन्य घेऊन प्रदेश उध्वस्त करीत सुटला होता. मे महिन्यात तो खुद्द पुण्यात डेरेदाखल झाला. आणि राजांच्या लालमहालात तळ ठोकून बसला. दुहेरी संकट राजांवर

कोसळले होते.

जिजामाता त्यावेळी राजगडावर होत्या. त्यांच्या मनाची तगमग होत होती. तरी त्या धैर्याने उभ्या होत्या. राजांना वेढ्यातून युक्तीने सोडवणे हा एकच मार्ग दिसत होता. पण सिद्दीचा वेढा मजबूत होता. एक दिवस जिजामातेच्या मनात विचार आला, अशी काळजी किती दिवस करायची? स्वस्थ बसून हताश होऊन संकट कसे टळणार? काहीतरी करायला हवं, क्षत्रियाच्या ब्रीदाला जागायला हवं. विचाराअंती त्या वीर मातेला विलक्षण स्फुरण चढले. गडावर होते नव्हते ते सैन्य जमवून जिजामाता स्वतः शस्त्र सज्ज झाल्या आणि पन्हाळ्याकडे जाण्याच्या तयारीत लागल्या, पण एवढ्यात विजापुरच्या बाजूची मुलूखगिरी करून नेताजी पालकर आणि सिद्दी हिलाल राजगडी येऊन पोचले. जिजामाता रागाने लाल झाल्या होत्या. पुत्र दर्शनासाठी त्यांचा जीव तळमळत होता. नेताजीला बघताच त्या आवेशाने म्हणाल्या, माझा योद्धा शूर पुत्र तिकडे शत्रूच्या वेढ्यात अडकून पडला आहे. आणि तुम्ही धन्याला सोडून भ्याडपणे इथे आला आहात. आता मीच जाते आणि जौहरचे मुंडके कापून आणते. तुम्ही आता शत्रूशी लढा वा लढू नका मी मात्र निघाले आता.'

जिजामातेच्या आवेशाने नेताजी घाबरला, खजिल झाला आणि जिजामातेला म्हणाला, 'आम्ही चुकलो मासाहेब. आम्ही तुमच्या पायाची शपथ घेतो. राजांना सोडवून आणल्याबिगर गडावर पुन्हा येणार नाही.'

जिजाईनं मायेनं नेताजीच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हणाले, 'राज्य करायचं म्हणजे नुसतं विचार करून भागत नाही सेनापती. त्याला कृतीची जोड हवी.'

नेताजीने जिजामातेला जाण्यापासून आवरले आणि पन्हाळ्याचा वेढा उठवण्याच्या कामगिरीसाठी घोडे भरधाव सोडले.

सिद्दीचा वेढा दिवसेंदिवस अधिक मजबूत होत होता. राजे विचार करीत होते. एक वेगळी कल्पना राजांच्या डोक्यात चमकून गेली आणि त्यांनी ती बरोबरच्या बाजी प्रभूंना सांगितली. मग एकीकडे शिवाजी राजांनी शत्रूशी वरकरणी तहाची बोलणी चालविली आणि दुसरीकडे एका चांदण्यारात्री भर पावसात ते वेढ्यातून निसटून गेले. पहाट झाली, दिवस वर आला. शत्रूच्या छावणीत गडबड उडाली. 'शिवाजी भाग गया' असा कोलाहल सगळीकडे माजला. त्यांना पकडण्यासाठी सिद्दीचे घोडेस्वार ताबडतोब निघाले. राजे गजापूरच्या खिंडीत पोचले होते. विशालगड तिथून ५-७ मैल होता. तेवढ्यात शत्रू जवळ येऊन ठेपला. साक्षात मृत्यूच समोर आला. पण यावेळी सैन्यातील सरदार बाजी प्रभू पुढे आला. राजांना पुढे जाण्याची विनंती करून त्याने खिंड लावून धरली. पराक्रमाची शर्थ करून बाजीने शत्रूला रोखून धरले. त्याचे कपडे रक्ताने माखून गेले होते. तरी बहाद्दर चार-पाच तास झुंजत राहिला. सायंकाळी शिवाजी राजे गडावर सुखरुप पोचल्याची तोफ त्याने ऐकली आणि मग त्या शूर वीराने देह ठेवला.

बाजीप्रभूच्या वीर मरणाने खिंड पावन झाली. आणि त्यावेळेपासून गजापूरची खिंड पावन खिंड म्हणून प्रसिद्ध पावली. स्वराज्यावरील आणखी एक आरिष्ट टळले होते! बाजी प्रभूच्या आत्मबलिदानाने जिजामाता सुन्न झाल्या तर शिवाजी राजांचे डोळे कृतज्ञतेने भरून आले. शिवबासुखरुप आहे ही वार्ता ऐकून जिजाईच्या जिवात जिव आला. राजे तातडीने राजगडावर गेले. जिजामाता दिसताच त्यांना वंदन करून राजांनी मिठी मारली. मायलेकरांच्या भेटीचे भावपूर्ण दृश्य पाहून जमलेल्या सर्वांची अंतःकरणे गहिवरून गेली.

■

# ८. शहाजी राजांचे निधन

सिद्दीजौहरला पळवून लावल्यानंतर मोगलांचा शाहिस्तेखान रजांवर चाल करून आला. राजांनी अंबरखिंडीत त्याच्यावर हल्ला केला आणि त्याला शरण यायला लावले. पुण्यावरचा विळखा सैल झाला.

शिवाजी राजांच्या अंबरखिंडीच्या विजयाने गडावर आनंद साजरा झाला. ह्या आनंदोत्सवात शहाजीराजे जेजुरीला आल्याची आणखी



एक आनंदाची बातमी आली. जिजाईंना खूप आनंद झाला. राजांना कधी एकदा भेटू असं त्यांना झालं. एकाहून एक सूचना दिल्या जात होत्या. गडाची सदर रंगवून झाली. सखूबाई, महादजी, बजाजी यांना निरोप गेले. सुनांना सूचना दिल्या गेल्या. पाकखान्यात आदेश गेले. सगळेजण अमाप आनंदात होती.

कधीकधी दुःखासारख्या सुखाच्या बातम्या जोडून येतात याचा प्रत्यय आला. शिवाजीराजे तळकोकणचा संग्राम फत्ते करून आले आणि त्यात ही शहाजी राजांची बातमी आली.

गडावरची नेमकी मंडळी जेजुरीकडे निघाली.

जेजुरीहून काही अंतरावर शिवाजीराजे पायउतार होऊन शहाजीराजांच्या भेटीला गेले आणि त्यांना सन्मानानं गडावर घेऊन आले. गडावर नौबती झडल्या, नवचैतन्य फुललं.

जिजाई आणि शिवबा या दोघांच्या तोंडाकडे आळीपाळीने पाहत शहाजीराजे म्हणाले, 'राजे तुमच्या माँसायबांनी तुम्हाला छान तयार केलंय. दोन दोन शत्रूना खिळवून ठेवलेत तुम्ही, धन्य आहे तुमची.

'हे सारं आपल्या आशीर्वादाचं फळ आहे, आबासाहेब' शिवबा राजांचा पदस्पर्श घेत उत्तरले.

कुटुंबातील सर्व स्त्री-पुरुषांचा मेळावा जमला होता. सर्वत्र आनंदाचं वातावरण होतं. जिजामातेच्या आनंदाला सीमा उरली नव्हती. शहाजी राजे पुत्राबरोबर किल्ले पाहत पाहत खूप हिंडले. रायगडावर आल्यावर, हीच राजधानी करा असा सल्ला दिला. नंतर पुण्याच्या वाड्यात काही दिवस राहून पिता-पुत्र पुन्हा जेजुरीत आले. राजांना कर्नाटकात जाणे भाग होते. आपल्या पराक्रमी पुत्रास तुळजा नावाची तलवार आणि अनेक आशीर्वाद देऊन शहाजी राजांनी जड व व्याकुळ अंतःकरणाने सर्वांचा निरोप घेतला.

शिवाजी राजे सुरत लुटून गडावर आले होते. खूप आनंदात



होते. परंतु एक दुःखद बातमी त्यांची वाट पहात होती. येताच फिरंगोजीने थोरले महाराज शहाजी राजे सोडून गेल्याची वाईट बातमी दिली. शिमोगा जिल्ह्यात पाळेगावचे बंड मोडण्यासाठी शहाजी राजांची रवानगी आदिलशहाने केली होती. राजांना शिकारीचा अतोनाद नाद. एक दिवस तुंगभद्रेच्या काठी बसवापट्टणाकडे राजे शिकारीला गेले होते. वेळ संध्याकाळची होती. होदिगरे गावाजवळ हरिणाची शिकार करता करता राजे घोड्यावरून दूर फेकले गेले. दगडावर डोके आपटले, जखमी झाले आणि थोड्याच वेळात त्यांचे निधन झाले (२३-१-१६६४) आपला पराक्रमी पुत्र शिवाजीचे वैभव पाहण्यास त्यांना जगायचे होते. पण ईश्वराच्या मनात वेगळेच होते आणि तसेच घडले.

वार्ता कळताच कुणीतरी काळजावरून सुरी फिरवावी तसे राजांना झाले, राजे विव्हळले आणि तात्काळ त्यांनी विचारले, जिजामाता कुठे आहेत?'

'राजे लवकर चला. मासाहेब सती जाण्याची तयारी करून बसल्या आहेत.' फिरंगोजीने घाबरत सांगितले.

राजे धावत धावत महालात आले... जिजाई मळवट भरून, हिरवं वस्त्र नेसून जमिनीवर बसल्या होत्या.

राजे आकांताने म्हणाले, 'मासाहेब आम्हाला सोडून तुम्ही जाऊ शकणार नाही.'

जिजाईने शिवाजी राजांना कुशीत घेतले आणि त्यांना मायेने गोजारू लागल्या.

राजे म्हणाले, 'मासाहेब, तुम्ही आमचं सर्वस्व आहात. आता तुम्ही नसला तर स्वराज्य मिळवून ते दाखवायचे तरी कुणाला? आम्हाला आमच्यासाठी नाही, तरी उद्याच्या हिंदवी स्वराज्यासाठी तुम्ही हव्या आहात.'

जिजामातेच्या डोळ्यात अश्रू दाटून आले. त्यांनी शिवबाला घट्ट मिठी मारली आणि छातीशी कवटाळले. मन घट्ट करून पुत्र प्रेमासाठी आणि कर्तव्यपूर्तीसाठी जिजामातेने जगायचे ठरविले.

'शिवबा, तुम्ही जिंकलात' एवढंच त्या पुटपुटल्या.

स्वराज्याचा अरुणोदय पाहिल्याशिवाय डोळे मिटायचे नाहीत असाच त्या महान मातेने मनाशी दृढ निश्चय केला.

■

# ९. जिजामातेची तुला

शहाजीराजांच्या निधनानंतर शिवाजीराजे आणि जिजाई या दोघांनाही उसंत अशी मिळत नव्हती. राजे मोगली प्रदेशात धुमाकूळ घालत एकेक मोहिम फत्ते करीत होते आणि त्यांच्या अनुपस्थित जिजाई राज्यकारभार हाकत होत्या. लहानसहान घटनांवर त्यांचे बारीक लक्ष असे. त्यानंतर दोन-चार महिन्यानीच आदिलशहाचा सरदार खवासखान पूर्वीचा तह विसरून शिवाजी राजांच्या मुलुखावर चाल करून आला. बाजी घोरपडे आणि सावंत हेही त्याच्याबरोबर होते. शिवाजी राजे त्यावेळी मंगळूर बसनूरकडे आरमारी स्वारीच्या तयारीत गुंतले होते. जिजामातेला खवासखानाच्या स्वारीची बातमी हेरांकडून कळली तिने राजांना पत्र लिहून इशारा दिला आणि त्याचा बंदोबस्त करण्याचा मनोदय कळवला. 'विजापूरकरांनी खवासखानास कुडाळ येथे पाठवलंय. त्याला बाजी घोरपडे आणि खेमसावंतही येऊन मिळणार आहेत.'

आपल्या वडिलांना कैद करून अपमानित करणाऱ्या बाजी घोरपड्यास मुधोळला गाठून त्याचा प्रांत लुटून राजांनी लढाईत त्यास ठार मारले. त्याच त्वरेने खवासखान कुडाळला पोहोचण्याआधीच

त्याला बिकट अरण्यात गाठले. खवासखान शिताफीने पळून गेलातर खेमसावंतने गोव्याचा आश्रय घेतला. राजांनी तिथे जाऊन त्यास दमविले, नमविले आणि शेवटी तहात त्याचा मुलुख ताब्यात घेतला. याच मोहिमेत त्यांनी समुद्रात सिंधुदुर्ग किल्ल्याचं बांधकाम सुरु केलं आणि गलबत बांधण्याचा कारखाना उभारला.

शिवाजी राजांच्या कारभारात जिजामाता जरुर तेवढे लक्ष घालीत असत. जिजाईच्या प्रजावात्सल्याची दोन उदाहरणे बोलकी आहेत. विठोबा हैबतरावाच्या मुलीचे लग्न ठरले होते. त्याचा रोजचा प्रपंच कसाबसा चालत असे त्यामुळे लग्नात इच्छा असूनही थोरामोठ्यांना बोलावणे त्याला शक्य झाले नाही. जिजाईंना त्याची ही स्थिती कळताच तिने २५ होन आणि ५०० माणसांच्या जेवणाचे सामान त्याच्याकडे रवाना केले आणि त्या गरिबाची चिंता दूर केली. तर दुष्काळ पडला असता 'परागंदा झालेल्या एका कुलकर्णी कुटुंबाचा तिने परामर्श घेतला आणि त्या कुटुंबाला मदत केली.

१६६५ च्या जानेवारीत (दि. ६) सूर्यग्रहणाची पर्वणी आली होती. अशा पर्वणीला तुला करून दानधर्म करण्याची धार्मिक रीत पूर्वीपासून चालत आली आहे. जिजामाता एकदा शिवाजी राजांना म्हणाल्या, 'शिवबा, महाबळेश्वराचं दर्शन घेण्याची इच्छा झाली आहे, तेव्हा...'

राजे तात्काळ उत्तरले, 'मासाहेब, मनातलं बोललात, सूर्यग्रहण येतंय तुमची सुवर्ण तुला करून दानधर्म करायची इच्छा आमच्या मनात आहे.'

दोघांच्याही इच्छा जुळल्या होत्या. राजे आपल्या मातेच्या मनाशी कसे एकरुप झाले होते, त्याचा हा प्रत्यय होता.

कृष्णा, कोयना, वेण्णा, गायित्री आणि सावित्री या पंच गंगांचं उगमस्थान असलेलं महाबळेश्वर हे पवित्र ठिकाण. तिथलं मंदिर शोभिवंत



झालं. रत्नखचित तुला लावण्यात आली. शाही मेणे महाबळेश्वरी रवाना झाले.

सूर्यग्रहणाच्या दिवशी जिजामातेनं शुचिर्भूत होऊन महाबळेश्वरी शिवलिंगाचं दर्शन घेतलं, पूजा केली. सनई चौघड्यांच्या निनादात राजमाता तुलेच्या एका पारड्यात बसल्या. दुसऱ्या पारड्यात पुतळ्या मोहोरांची तबकं रिकामी झाली. डोळ्यातील आनंदाश्रू आवरीत जिजामाता म्हणाल्या, 'शिवबा, आमची कूस धन्य झाली. साता जन्माचं ऋण आज फिटलं'

तुळेतील सर्व ऐवजाचा राजांनी दानधर्म केला आणि सारी मंडळी राजगडी परतली.

■

# १०. राजांची आग्रा भेट

१६६५ साली औरंगजेब बादशहाने शिवाजी राजांविरुद्ध प्रचंड मोहीम काढली. या मोहिमेत मिर्झाराजे जयसिंगाबरोबर दिलेरखान आणि इतर बडे सरदार त्यांनी धाडले होती. मिर्झाराजे ऐंशी हजार फौज, पाच हजार पठाणांचा ताफा आणि प्रचंड तोफांचा फौजफाटा घेऊन महाराष्ट्रात उतरला. महाराष्ट्रात येताच मिर्झाने सुपे, जुन्नर, लोणी, पुणे, शिरवळ वगैरे ठिकाणी हैदोस घातला. पळवून नेलेल्या बायकांच्या किंकाळ्यांनी सारा आसमंत विव्हळत गेला. घोड्यांच्या टापांनी अवघा परिसर हादरून गेला. गाव गाव शेगोट्या बनल्या, गुरं पळवली गेली. लूटमार, अत्याचार याची गणतीच राहिली नाही. मिर्झा शिवाजी राजांच्या साऱ्या मुलखावर वरंवटा फिरवीत सुटला होता.

मिर्झाराजेनी रघुनाथ पंडितांकडे पत्र देऊन राजांची संपूर्ण शरणागती मागितली. राजांना रयतेवर होणारे अत्याचार पाहवत नव्हते. तह करणे भाग होते आणि राजांना मिर्झाच्या संपूर्ण मागण्यांना रूकार द्यावा लागला. राज्याचे तेवीस गड, चार लक्ष होनांच्या मुलखांसह मोगलांना द्यावे लागले. त्यात कोंडाणा देखील होता. शिवाजी राजांजवळ, राजगड, रायरी धरून अवघे बारा गड राहिले आणि एक लाखाचा

मुलुख राहिला.

मिर्झाराजेबरोबर केलेल्या तहानं राजावर मोठी नामुष्की ओढवली होती. त्यांचा चेहरा अपमानानं काळवंडला. भेटल्यानंतर जिजामाता म्हणाल्या, 'राजे, आपल्या पराभवात यशाची बीजं असतात हे लक्षात ठेवा. जी पावलं पराभवातून, अपमानातून नावून सुखावून निघतात त्यांचाच भविष्यकाळ उज्ज्वल असतो. आई भवानीचे आशीर्वाद तुमच्या मागे आहेत. आणखी काय हवं?'

जिजाईच्य शब्दाने राजे सावरले, धीराने कामाला लागले.

मिर्झाराजेनं शिवबांचा मुत्सद्दीपणा पाहिला होता. शिवबांना भेटल्यानंतर त्याने त्यांच्यापुढे शंभूराजांसह आग्ऱ्याला जाऊन शहेनशहाची भेट घ्यावी असा प्रस्ताव ठेवला तसेच शिवाजी राजांच्या जीविताची आणि संरक्षणाची सारी हमी स्वीकारली.

मोगली ताकद शिवाजी राजांनी अनुभवली होती तेव्हा तूर्त औरंगजेबास खूष ठेवावे आणि तो जर आपल्या बाजूनी राहिला तर दक्षिणेकडील आदिलशाही, कुतुबशाही आणि जंजिऱ्याचा सिद्दी यांना नेस्तनाबूत करणे सोपे होते आणि हे एकदा झाले की मग उत्तरेकडे हात घालावा अशी खूप महत्वाकांक्षी योजना राजांच्या मनात तयार होत होती.

राजांनी आपल्या मंत्रीमंडळाशी विचारविनिमय केला आणि शंभूराजांना घेऊन आग्ऱ्याला शहेनशहाच्या भेटीस जाण्याचा बेत पक्का केला.

तानाजी मालुसरे, येसाजी कंक, सर्जेराव जेधे, हिरोजी फर्जंद अशी निवडक मंडळी आणि आपला चार हजार स्वारांचा ताफा घेऊन शिवाजी राजे शंभू राजेंसह आग्ऱ्यास निघाले.

औरंगजेब बादशहाने प्रवासात आणि पुढे राजधानीत राजांची बडदास्त उत्तम ठेवली होती. पण आलमगिराच्या साध्या भेटीसाठी

त्यांना तिष्टत ठेवण्यात आले आणि प्रत्यक्ष दरबार भेटीच्या प्रसंगी राजांना भलत्याच ठिकाणी स्थान देऊन त्यांचा मुद्दामहून अपमान करण्यात आला. या अपमानाने रागाची तिडीक राजांच्या पार मस्तकात गेली.

मिर्झाराजेनी मान्य केलेल्या साध्या अटी पाळण्यास औरंगजेबाने सफशेल नकार दिला.

एका रजपुताच्या शब्दास काडीची किंमत राहिली नव्हती. राजाना आपले भविष्य ठीक नाही हे हळुहळू जाणवू लागले होते.

अशात शहेनशहानं फिदाई हुसेन याला राजांकरिता खास वाडा बांधण्याचं आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू घडवून आणण्याचं एक विलक्षण कपटी कारस्थान रचलं असल्याची बातमी राजांच्या हेरानीच आणून त्यांच्यापर्यंत पोहोचवली. राजे खूप बेचैन झाले.

विचार करता करता एक विलक्षण धाडसी योजना राजांच्या डोक्यात आणि आणि राजांचे डोळे चकाकले, अस्वस्थ मन शांत झाले.

राजांनी आपले सारे सैन्य परत पाठवण्याची परवानगी गुलाबसिंहाच्या मदतीने शहेनशहाकडे मागितली. शहेनशहा मनातल्या मनात खूष झाला. त्याला हेच हवे होते. राजांनी काही मोजकी माणसे मागे ठेवून बाकीच्यांना स्वराज्यात रवाना केले. राहिलेल्या खास लोकांना राजाने वेगवेगळ्या भागात गुप्तपणे पेरून ठेवले. प्रत्येकावर विशिष्ट कामगिरी सोपवली. पहाटे चौक बदलण्याचा वेळा नीट ध्यानात घेतल्या. पोलादखानाशी दोस्ती जमवली आणि राजे अचानक आजारी पडले, त्यांनी अंथरुण धरले.

औषधपाण्यासाठी राज वैद्य येऊ लागले. दानधर्म करण्याबरोबर तब्येतीस आराम पडण्यासाठी राजांनी शहेनशहाकडून त्यांच्या हितचिंतकांना, मित्रांना मिठाईचे पेटारे पाठवण्याची परवानगी मागितली

आणि पहिला पेटारा खुद्द शहेनशहाला रवाना करण्यात आला. पोलादखान तसेच आगऱ्यामधल्या इतर अनेक अधिकाऱ्यांनाही तसेच पेटारे रवाना झाले. ठराविक वेळी सतत हा उद्योग होत होता. पहारेकरी नेहमी तोच तोच उद्योग करून कंटाळले, आळसावले आणि तपासणी सैल झाली आणि अचानक एक दिवस पिंजऱ्यातून पंछी उडाल्याची बातमी खासे महालात आली. शहेनशहा अंतर्बाह्य हादरून गेला. त्याचं सारं शरीर, सुन्न होऊन गेलं, चेहरा काळवंडला आणि त्याच्या मुखातून शब्द आले– 'ये अल्लाह यह क्या हुआ? काफीर शिवाजी भाग गया...'

वेषांतर करून राजे निसटले ते प्रथम मथुरेस गेले. तिथे मोरोपंताचे मेहुणे कृष्णाजी होते. त्यांच्या हवाली संभाजीला देऊन राजे अतिशय त्वरेने महाराष्ट्रात पोचले. जिजामाता डोळ्यात प्राण आणून राजांची वाट पाहत होत्या. पुत्राच्याच गैर हजेरीत राज्याचा कारभार सांभाळीत होत्या.

राजगडाच्या पद्मावती माचीवरील वाड्यात एक दिवशी सकाळी वर्दी गेली की, कोणी बैरागी साधु मातोश्रींचे दर्शन मागतात म्हणून. जिजाईंनी परवानगी दिली. बैरागी ओसरीवर आले. त्यांच्यापैकी एकाने जिजामातेचे पाय धरले. बैराग्याच्या डोळ्यावरील जखमेच्या खुणेकडे जिजाईंचे लक्ष जाता त्यांनी तात्काळ ओळखलं. त्या म्हणाल्या, 'शिवबा, माझ्या लाडक्या उठ' मायलेकरं कडकडून भेटली. गडावरील सर्वजण आनंदाने बेहोष झाले, संतुष्ट झाले.

एवढ्या आनंदान लाडका नातू दिसन नव्हता म्हणून जिजाई हिरमुसल्या होत्या.

'शिवबा शंभूराजे कुठे आहेत?' त्यांनी आर्ततेने विचारले.

त्यावर राजे तात्काळ म्हणाले, 'मासाहेब, मी आलो तसाच तोही एक दिवस येईल. त्याच्या जिवास काही अपाय होऊ नये

म्हणून आम्हीच त्यांच्याविषयी अशुभ वार्ता पिकवली होती. तो सुखरुप आहे'

आणि मग एकदिवस मथुरेचे कृष्णाजी संभाजी राजांना घेऊन राजगडावर आले. आजी जिजाईने त्याला कवटाळून धरले. जिजामाता धन्य झाल्या होत्या. त्यांना पुत्र भेटला, नातू भेटला. सर्व काही मिळाले. स्वराज्यावरील भीषण संकट टळले होते.

■

# ११. राजांचा राज्याभिषेक

शिवाजीराजे आगऱ्याहून सुटून राजगडावर आल्यावर त्यांनी थोडीही उसंत न घेता फौजा सिद्ध केल्या. आणि मोगलांच्या घशात गेलेला आपला मुलुख जिंकण्याची मोहीम काढली. पुरंदरच्या तहाने गेलेला सारा मुलुख आणि किल्ले तर राजांनी घेतलेच त्याशिवाय आणखीही प्रदेश आपल्या स्वामित्वाखाली आणला. अमाप संपत्ती खजिन्यात गोळा झाली. विजापूर आणि गोवळकोंडा सुलतानांनी शिवाजी राजांना दरसाल तीन लाख आणि पाच लाख देण्याचं कबूल केलं. औरंगजेब मात्र बेचैन झाला. दर दिवशी शिवबाचं कर्तृत्व त्याच्या कानी पडत होतं. पुरता हताश होऊन तो स्वतःच्या मूर्खपणाला दोष देत राहिला.

राजांनी कोंडाणा (सिंहगड) जिंकल्यावर पंधरा-वीस दिवसांनी जिजामातेची दुसरी सून सोयराबाई प्रसूत होऊन तिला मुलगा झाला (२४-२-१६७०) मुलाचे नाव राजाराम ठेवण्यात आले. राजांनी थोड्याच दिवसात आपल्या कुटुंबाचा मुक्काम राजगडावरून रायगडावर हलवला. रायगडची हवा थंड आणि तिथे पाऊसही खूप पडे. तिथली हवापाणी जिजामातांना मावनेवा, म्हणून राजानी रायगडच्या पायथ्याशी



पाचाड गावी त्यांच्यासाठी एक गढी (वाडा) बांधली. रायगडला लागणारे बरेचसे सामान पाचाडच्या बाजारपेठेतून जात असे. जिजामातांचं उर्वरित आयुष्य पाचाडच्या वाड्यात गेले. इथं त्यांना शांतता होती, कसली दगदग नव्हती. कोणी काही तक्रार घेऊन आले किंवा विचारपूस केली तर तेवढ्यापुरते त्या कारभारात लक्ष घालीत. एरवीचा सगळा वेळ देवधर्मात नि पुराण श्रवणात त्या घालवीत. आईच्या सुखसोयीत राजांनी काही कमी पडू दिले नाही.

मराठी मने, मराठी माणसे शिवाजींना राजा मानू लागली होती पण काहींच्या मनातून गुलामी वृत्ती गेली नव्हती. आदिलशहाला आणि औरंगजेबाला राजांनी पाणी पाजले तरी त्यांना ते खरे वाटेना. काही नतद्रष्टांच्या शंकाकुंशकाना जागा राहू नये, तमाम लोकांना स्वराज्याची प्रचीती मिळवून द्यावी यासाठी राज्याभिषेक करून घ्यायची आवश्यकता होती. यासाठीचा जिजामातेचा आग्रहही त्यांना मोडता आला नाही.

किल्ले रायगडावरील तटबंदी मजबूत झाली होती. इमारतींचे

रंगकाम संपले होते. धनधान्यानी कोठारे भरली होती आणि तलावांमध्ये भरपूर पाण्याची सोय होती. गडावर कशाची म्हणून कमी रहिली नाही. राजांनी मोरोपंतांकरवी सगळी तयारी केली होती. रायगड नव्या नवलाईने सजला होता. राज्याभिषेकासाठी आकर्षक व भव्य सजावट केली जात होती. गडावर नव्या विशाल तसेच भव्य राजमंदिरांची भर टाकण्यात आली होती. राजसभा, जगदीश्वर प्रासाद नव्यानं सजवून शृंगारून उभे करण्यात आले होते. गंगासागराच्या काठावरील मोरावानी थुईथुई नाचणारी कारंजे सर्वांना मनोहारी दृश्यांची खैरात करीत होती. प्रवेशद्वारी नगारखाना सज्ज ठेवण्यात आला. सोनारशाळेत अठरा मण वजनाचं सोन्याचं देखणं सिंहासन भारतीय शास्त्ररित्या बनविण्यात आले. धर्मसिंहासन  युक्त राजांची राजमुद्रा तयार करण्यात आली. राज्याला न्याय देणारा राजदंड बनला. राज्याभिषेक याचि डोळा याचि देहा पाहण्यासाठी गडावर प्रचंड गर्दी झाली. दहा हजार लोकांना बसण्याची सोय करण्यात आली आणि त्यासाठी प्रचंड ति भव्य शामियाने उभारण्यात आले.

प्रतापगडावर जाऊन शिवाजी महाराजांनी भवानी देवीचे दर्शन घेतले. येताना पाचाडला मुक्काम करून राजमाता जिजाईंना पालखीत घालून स्वारी गडावर प्रवेश करती झाली. काशीच्या गागाभट्टाकडे समारंभाचे पौराहित्य देण्यात आले होते. तत्पूर्वी देशभरातील पवित्र नद्यांचं जल सुवर्ण कुंभात भरून गडावर ठेवण्यात आले होते. समारंभाला प्रारंभ झाला.

२८ मे १६७४ रोजी शिवाजीराजांची मुंज झाली. राजांचा तुलादान विधी आदी कार्यक्रम संपन्न झाले. प्रत्यक्ष राज्यारोहण समारंभ शके १५९६ ज्येष्ठ शु. १३ शुक्रवार ६ जून १६७४ या दिवशी पहाटे पाचच्या सुमारास घडला. सिंहासनावर बसण्यापूर्वी महाराजांनी राजमाता जिजाईंना वंदन करून त्यांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर राजे शिवबा,

राणी सोयराबाई व शंभूराजे सोन्याच्या चौरंगावर बसले. त्यांच्यावर सुवर्णकलशातून अभिषेक करण्यात आला. ब्राह्मणांनी मंत्र म्हटले. जमलेल्या हजारो लोकांनी राजांचा जयजयकार केला. सकाळी सात वाजता छ. शिवाजी महाराज दरबारात सिंहासनावर आरूढ झाले. गागाभट्ट, मोरोपंत व इतर अष्टप्रधान जवळच उभे राहिले. युवराज संभाजी राजांच्या पायथ्याशी बसले. त्यानंतर दूरदूरून आलेल्या सरदार मानकऱ्यांचे मुजरे होऊन नजराणे सादर झाले. इंग्रजांच्या वकिलांनेही नजराणा पेश केला.

या वैभवशाली समारंभात अमाप पंक्तिभोजने झाली, दान धर्म करण्यात आला. राजांचे नवे नाणे पाडण्यात आले तसेच नवा राज्य व्यवहार कोश निर्माण करण्यात आला.

नव्या राजशकास प्रारंभ झाला होता.

राजमाता जिजाई हा सोहळा आनंदाने पाहत होत्या. त्यांच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू दाटून आले. सकल मनोरथ पूर्ण झाल्याचे, जीवन कृतार्थ झाल्याचे ते अश्रू होते. रात्री शिवबास जवळ बोलावून, कुरवाळून त्या अपार मायेनं पुत्राला म्हणाल्या, 'शिवबा भाग्याचा झालास महाराष्ट्राचा राजा झालास, लोकांचा राजा झालास माझे मनोरथ पूर्ण केलेस.'

दुसऱ्या दिवशी पालखीत घालून जिजामातेला पाचाडात पोचविण्यात आले.

गडावरून आल्यापासून त्यांना खूप थकवा जाणवू लागला होता. राजे रोज भेटून जात होते आणि एकदिवस राजमातेची प्रकृती फार बिघडली. राजमाता गेल्याचे कुणीतरी सांगितले आणि शिवाजी राजे ढसाढसा रडले. तो दिवस होता बुधवार १७ जून १६७४ (ज्येष्ठ वद्य ९ शके १५९६) गडावरील सुख सोहळ्यांनंतर अकराव्या दिवशी महाराजांवर मातृवियोगाचे दुःख कोसळले होते.



राजांनी पाचाडगावी ज्या ठिकाणी जिजामातेना वंदनाची चिता उभारून अग्नी दिला, त्याठिकाणी त्यांचे स्मारक म्हणून छत्री उभारली आणि साश्रुनयनांनी महान कर्तृत्ववान मातेला निरोप दिला.

■



अशोक बेंडखळे

राजमाता जिजाई या शिवाजी राजांच्या माता, त्यांच्या मनात स्वराज्याचा अंकुर रूजवणाऱ्या आणि त्यांना हिंदवी राज्याची प्रेरणा देणाऱ्या. जिजाईंना बालपणी मराठी सरदार परकीयांची वेठबिगारी करतायेत हे आपल्या बंधुंकडून कळले आणि त्यांच्या मनात स्वराज्याचा विचार पक्का झाला. त्यांनी राजांवर उत्तम संस्कार केले. मर्दानी कलांमध्ये पारंगत केले. पुण्याचा कारभार पाहताना शिवबांना कारभाराची तंत्र-मंत्र शिकवली. शिवाजी राजे मोहिमांवर जात तेव्हा जिजामाता कारभाराकडे लक्ष देत. राजांचा राज्याभिषेक झाला आणि आपला पराक्रमी पुत्र लोकांचा राजा झाला हे पाहून त्या कृतार्थ झाल्या. एक माता मनात आणले तर काय करू शकते त्याचे जिजामाता हे ज्वलंत उदाहरण आहे.